09 TO 15 SEPTEMBER 2024 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 9/6/2024 5:26 PM Page 1







गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ | अंक : ३६ | सोमवार दि. ९ सप्टेंबर २०२४ ते रविवार दि. १५ सप्टेंबर २०२४ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

## कर्जबाजारी विनायकमुळे संसाराचे वाटोळे झाले पत्नी-सासूने गळा दाबून कायमचे कर्जमुक्त केले





बेळगावी/क्राईम रिपोर्टर

**कुठल्याही माणसाने आपल्या पापात कुटुंबाला भागीदार करण्याचा प्रयत्न करू नये. कारण ज्याने करायचे त्यानेच भरायचे असा साधा आणि सरळ नियम आहे. पण काही लोक गुन्हे करतात आणि हे आपण आपल्या कुटुंबासाठी केले असे सांगतात, पण अशावेळी कुटुंब सरळ हात वर करते आणि त्याच्या पापात आमचा काहीही संबंध नाही असे सांगून मोकळे होते. कारण दुसऱ्याच्या पापात आपण का सहभागी व्हावे अशी लोकांची साधी सरळ मानसिकता असते. त्यामुळे रक्ताच्या नात्यातील माणसाने जरी एखादा गुन्हा केला तरी त्याच्या त्या गुन्ह्या पासून कुटुंबातले लोक स्वतःला सेफ करून घेतात. पण काही लोक मोठे गुन्हे करतात आणि त्यातून सुटका करून घेण्यासाठी कुटुंबाची मदत मागतात. कुटुंबाने मदत करण्यास नकार दिल्यास कुटुंबाला धमक्या देतात. त्यामुळे मग स्वतःच्या बचावासाठी कुटुंबालाही टोकाचे पाऊल उचलावे लागते. बेळगावमधील पिरनवाडी येथे विनायक नामदेव जाधव नावाचा इसम कर्जबाजारी झाला होता आणि हे कर्ज आपल्या पत्नीने तिच्या माहेरा मधून पैसे आणून फेडावे अशी त्याची इच्छा होती. सुरवातीला पत्नीने महेरातून पैसे आणून काही कर्ज फेडले, पण जे मोठे कर्ज होते ते कुठून फेडणार असे म्हणत तिने पतीला तुझे तू बघून घे असे सांगितले. त्यावर चिडलेल्या विनायकने पत्नीला ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे पत्नी घाबरली त्याने आपल्याला ठार मारण्याऐवजी आपणच त्याचा गेम केला तर, असा विचार तिने आणि तिच्या आईने केला आणि एके रात्री दारू पिऊन आलेल्या विनायकचा त्याची पत्नी आणि तिच्या आईने गळादाबून खून केला. या प्रकरणी पोलिसांनी मायलेकींना अटक केली आहे.**

बेळगावी मधील पिरनवाडी येथे विनायक नामदेव जाधव (वय ४८) हे आपल्या पत्नी मुलासह राहयला आहेत. गेल्या वीस वर्षापूर्वी शिंदोळी येथील रेणुका मंगन्नवार हिच्याशी त्याचे लग्न समाजाच्या रितीरिवाजा नुसार झाले. त्यांना दोन अपत्ये ही झाली. त्याचा संसार सुखा समाधानाचा चालला होता. विनायक हे आपल्या चरिर्थ्यासाठी लहान मोठा व्यवसाय करीत असत. त्यातून त्यांना बऱ्यापैकी नफा मिळत होता. सुरूवातीला त्याचा व्यवसाय मोठ्या जोमात चालू होता. त्याची उलाढाल ही मोठी होती. त्याच्या व्यवसायात त्याची पत्नी रेणुका ही त्यांना साथ देत असल्याने व्यवसाय भरभराटीला आला. आता मुले ही मोठी होत असल्याने आपला व्यवसाय वाढवा हे विनायक जाधव यांना वाटत होते. पण व्यवसाय वाढीसाठी त्याच्याकडे पुरेसे भांडवल नव्हते. त्यांनी त्यासाठी बँकेतून कर्ज घेण्याचे ठरविले. एका बँकेने त्यांना घर तारण देऊन तीन लाख रूपयांचे कर्ज दिले. कर्ज घेतल्यानंतर काही दिवसातच त्याचा व्यवसाय ठप्प झाला. कालांतराने बँकेने कर्ज वसुलीसाठी त्याच्याकडे तगादा लावला. बँकेचे कर्ज फेडण्यासाठी त्यांनी परत बाहेरून कर्ज घेतले. हे कर्ज खाजगी सावकाराकडून घेतले असल्याने त्याचे व्याज ही त्यांना परवडत नव्हते. व्यवसायातील मंदीने त्याचा व्यवसाय पुर्णता बसला होता. बँकेची थोडी फार राहिलेली रक्कम आणि खाजगी सावकाराकडून घेतलेले कर्ज फेडणे ...पान २ वर

## बाप काढल्याने बाचाबाची झाली गुंड टोळीने एकाची हत्या केली



नंदुरबार/क्राईम रिपोर्टर

**आजकाल मुंबई पुण्याप्रमाणे नंदुरबार सारख्या शहरांमध्येही गुन्हेगारी टोळ्या झाल्या आहेत आणि या टोळ्यांमध्ये वर्चस्वाची लढाई सूर झाल्यामुळे एकमेकांना ठसन देणे एकमेकांच्या विरोधात सुपाऱ्या घेणे, त्यातून दहशत पसरवणे, असे प्रकार सुरु झालेत. याच वादातून सावंत पवार याची प्रतिस्पर्धी टोळीने हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

तरूणांमध्ये गुन्हेगारीचे आकर्षण प्रचंड प्रमाणात वाढले आहे. हातात शस्त्रे घेऊन उध्दटपणे खुन्नस देत फिल्मी स्टाईलने फिरणे याचा मोह तरूणांना होतो, पण गुन्हेगारीने आयुष्याची कशी फरफट होते हे काही त्यांना माहित नसते. फिल्मी हिरो केवळ भूमिकेसाठी ते करत असतात याची जाणीव नसलेले निर्बुद्ध तरूण हातात शस्त्रे घेतात. टोळकी करून दहशत माजवूपहातात. आपल्याला लोक घाबरतात याचा माज आलेल्या तरूणांसमोर मृत्यू उभा रहातो, तेंव्हा मात्र ते जीव वाचवण्यासाठी पळ काढतात ही वस्तूस्थिती असल्यामुळे कोणताही गुंड कधीच एकटा फिरत नाही, कारण त्याला जीवाची भिती असते. त्यातूनगुंडांच्या टोळ्या निर्माण होतात, ते गोरगरीबांना त्रास देतात. नंतर मात्र या टोळ्या एकमेकाला भिडतात आणि टोळीयुध्दाचा भडका उडतो. मुंबई व दिल्लीसारख्या महानगरांमध्येच नाही तर लहान-लहान शहरामध्येही अशा टोळ्या तयार झाल्या असून त्यांच्यात एकमेकाचे खून पाडण्याचे सत्र सुरू झाल्याचे चित्र आहे. नंदूरबारसारख्या जिल्ह्यातही टोळीयुध्दातून एकाचा खून झाला, तर अन्य दोघे गंभीर जखमी असून मृत्यूशी झुंज देत आहेत. त्या तिघांवर हल्ला करणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यासाठी पोलीस यंत्रणा सक्रीय झाली आहे. शहादा तालुक्यातील म्हसावद पोलीस स्टेशन अंतर्गत फत्तेपूर-अमोदा-मडकाणी या गावातील तरूणतुर्क या परिसरातील नदीच्या काठी असलेल्या ...पान २ वर

## प्रेमीकाच्या चारित्र्याचा त्याला संशय आला चिडलेल्या प्रियकरानेच प्रेयसीचा खून केला

जळगाव/क्राईम रिपोर्टर



आरोपी किरण

**अनैतिक संबंध विश्वसनीय नसतात. केवळ शरीरसुखाच्या गरजेतून असे संबंध निर्माण होतात. त्यामुळे ते फार काळ टिकत नाहीत. अशातच प्रियकर जर संशयी असला तर त्याच्या हातून काहीही घडू शकते. जामनेर तालुक्यातील शहापूरमध्ये राहणाऱ्या संगीताला पती सोडून गेला. त्यामुळे तिचे किरण कोळी नावाच्या तरूणाशी सुत जुळले. पण किरण तिच्या चारित्र्यावर संशय घेत असे आणि याच संशयातून त्याने तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी प्रियकराला अटक केली आहे.**

वयाच्या ऐन तिशीत संगिता शिंदे या विवाहीतेचा पती तिला सोडून गेला होता. पतीपिराजी शिंदे याच्यापासून तिला एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये होती. सोडून गेलेला पती पिराजी आज नाही तर उद्या परत येईल अशी संगिताला आशा होती. मात्र तसे झाले नाही. जवळपास चार ते पाच वर्षाचा कालावधी लोटला. या कालावधीत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले मात्र संगिताचा पती पिराजी तिच्याकडे आला नाही. आपल्यासाठी नाहीतर आपल्या दोन लहान मुलांसाठी तरी तो परत येईल अशी भाबडी आशा तिच्या मनाला लागली होती. मात्र तिचा पती काही ...पान २ वर

## जुगाराचे व्यसन बर्बादीचे कारण ठरले समीर कुमारने नातेवाईकाला ठार मारले

नालासोपारा/क्राईम रिपोर्टर



**दारू आणि जुगार ही अशी व्यसने आहेत की एकदा का त्याचा नाद माणसाला लागला कि आपल्या या व्यसनांसाठी त्याला सतत पैशांची गरज भासू लागते. मग त्यासाठी तो कर्ज काढतो किंवा घरातल्या वस्तू गहाण ठेवतो. नालासोपाऱ्यात अशाच एका घटनेत प्रमोदकुमार बिंद यांचा नातेवाईक असलेल्या समीर कुमारला जुगाराचा नाद होता. त्यासाठी त्याने आपली दुचाकी गहाण ठेवली होती, ती सोडवण्यासाठी त्याने चक्क प्रमोदकुमार यांचा खून केला आणि त्यांच्या घरातील ४४ हजार रुपये घेऊन पळाला. मात्र पोलिसांनी उत्तर प्रदेशातील त्याच्या गावी जाऊन त्याच्या मुसक्या आवळल्या.**




नालासोपाऱ्यातील बांधकाम ठेकेदारार प्रमोदकुमार बिंद यांच्या हत्येचा अखेर उलगडा करण्यात गुन्हे शाखा ३ च्या पथकाला यश आले आहे. बिंद याच्या नातेवकाईनेच जुगाराच्या पैशांसाठी ही हत्या केल्याचे उघड झाले आहे. कसलाही दुवा नसताना गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी तरुणाला उत्तरप्रदेशातून अटक केली आहे. बांधकाम ठेकेदार असलेले प्रमोदकुमार बिंद (५२) हे नालासोपारा पूर्वेच्या घरतवाडीयेथील जोंगेद्र यादव चाळीत रहात होते. त्यांचे कुटुंबिय गावी गेल्याने ते घरात एकटे रहात होते. २४ ऑगस्ट रोजी सकाळी त्यांच्या घरात बिंद यांचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह आढळून ...पान २ वर

## मैत्रीत रमेशला त्याच्या मित्रानेच दगा दिला पत्नीला चिकटलेल्या रामकृष्णचा खून केला

बगांळुरू/क्राईम रिपोर्टर




आरोपी रमेश

**संसारात केवळ पैसाच आणि इतर भौतिक गरजच महत्वाच्या नसतात तर पती पत्नीने एकमेकांची शारीरिक गरज जर पूर्ण केली नाही तर संसारात मिठाचा खडा पडतो. अशावेळी बाईचा तोल जातो आणि तिला जे सुख तिच्या पतीकडून मिळत नाही ते सुख ती परपुरूषाकडून घेते. बंगळूरू विमानतळावर काम करणाऱ्या दोन मित्रांच्या मैत्रीची अशीच शोकांतिका झाली. रमेशच्या पत्नीला ते सुख मिळत नव्हते. त्यामुळे ती रमेशचा मित्र असलेल्या रामकृष्णला चिकटली. दोघांचे अनैतिक संबंध सुरु झाले. याची माहिती रमेशला समजताच रमेशने रामकृष्णाचा खून करून त्याला कायमचे संपवून टाकले. या प्रकरणी आरोपी रमेशला पोलिसांनी अटक केली आहे.**

बंगळुरू येथील केंम्पेंगौडा विमानतळ हे आतंरराष्ट्रीय विमानतळ म्हणून ओळखले जाते. या विमानतळावर रामकृष्ण आणि रमेश हे दोघेजण सफाई कर्मचारी म्हणून काम करीत आहेत. दोघे ही एकत्र काम करीत असल्याने दोघांची ही चांगली मैत्री होती. दोघांचे ही एकमेकांच्या घरी येणे जाणे होते. रामकृष्ण हा रमेश घरी नसताना ही त्याच्या घरी येत जात होता. त्याला रमेशची बायको (शालीनी) ही आवडत होती. शालीनीही नावाप्रमाणे दिसायला ...पान ६ वर

## दुहेरी हत्याकांडाचा पोलिसांकडून पर्दाफाश झाला जागेच्या वादातून दोघा इस्टेट एजंटांचा खून केला





नवी मुंबई/क्राईम रिपोर्टर

**मुंबई आणि नवी मुंबई या दोन महा नगरामध्ये सध्या जागांचे भाव गगनाला भिडलेले आहेत. त्यामुळे जागांच्या वादातून काही लोकांना आपले जीव गमवावे लागलेत. जागेच्या वादातून नवी मुंबईत अशाच दोन इस्टेट एजंटांना जीव गमवावा लागला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

नवी मुंबईतील दोघा रिअल इस्टेट एजंटच्या हत्येचे गूढ उकलण्यास अखेर नवी मुंबई पोलिसांना यश आले आहे. जमीन व्यवहाराच्या वादातून नेरुळमधील दोघा रिअल इस्टेट एजंटची हत्या करण्यात आल्याचे उघडकीस आली असून याप्रकरणी नवी मुंबई पोलिसांनी पाच आरोपींना अटक केली आहे. या दुहेरी हत्याकांडातील फरार असलेल्या एका आरोपीचा शोध सुरु असल्याची माहिती नवी मुंबईचे अप्पर पोलिस आयुक्त (गुन्हे) दिपक साकोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या हत्याकांडामध्ये सहभागी असलेला आरोपी विठ्ठल नाखाडे याने मृत सुमित जैन (३९) याच्याशी संगनमत करुन आपला दुसरा सहकारी अमिर खानजादा (४२) याची २१ ऑगस्ट रोजी नेरुळ येथे गाडीतच गोळ्या घालून हत्या केली. ...पान २ वर

## कौटुंबिक वाद भयंकर शिगेला पेटला दिराने वहिनी व पुतणीचा जीव घेतला




पालघर/क्राईम रिपोर्टर

**कौटुंबिक वाद वरवर जरी साधे किंवा घरघुती वाटत असले तरी ते जर वेळेवर मिटवले नाहीत तर त्यातून काहीही घडू शकते. कारण कुटुंबातील काही लोक शिघ्रकोपी असतात. त्यांना रागावर नियंत्रण ठेवता येत नाही. अशा लोकांच्या मनात सुडाची भावना असते आणि त्यातून तो एखाद्याचा जीव घ्यायलाही मागे पुढे पाहत नाहीत. पालघर जिल्ह्यातील सावरे गावात अशीच एक घटना घडली आहे. कौटुंबिक वादातून सतत होणाऱ्या भांडणाला कंटाळून एका इसमाने त्याच्या बहिणीच्या मदतीने वहिनी आणि तिच्या मुलीची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

पालघर तालुक्यातील सावरे गावात घडलेल्या दुहेरी हत्याकांडाची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. कौटुंबिक कलहातून वारंवार होणाऱ्या भांडणामुळे दिर आणि नणंद यांनीच आपली वहिनी आणि पुतणीची निर्घुण हत्या करून त्यांचे मृतदेह ...पान ६ वर

## सुट्ट्या पैशांवरून दारूड्यांशी वाद झाला अवघ्या ५ रुपयांसाठी गिरीशचा जीव गेला



इचलकरंजी (हुपरी)/क्राईम रिपोर्टर

**आजकालची तरुण मुले लहान वयातच दारू सारख्या व्यसनांच्या आहारी जातात. अशावेळी दारूच्या नशेत त्यांच्या हातून काहीही घडू शकते. पेट्रोल पंपावर दुचाकीत हवा भरण्यासाठी गेलेला नचिकेत कांबळे आणि त्याचा अल्पवयीन मित्र दारूच्या नशेत होते. दुचाकीच्या टायरमध्ये हवा भरल्यानंतर सुट्ट्या पैशावरून त्यांच्यात वाद झाला आणि ५ रुपयावरून त्या दोघांनी त्यामध्ये हवा भारणाऱ्याचीच हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

गिरीश विश्वनाथ पिल्लाई याचे हुपरी येथील जवाहर साखर कारखाना येथील पेट्रोल पंपाच्या शेजारी टायर पंक्चर काढण्याचे दुकान आहे.गेल्या वीस वर्षापासून ते येथे पंक्चर काढण्याचे काम करीत असल्याने त्यांना या परिसरात कुणी ओळखत नाही असे नव्हते. अगदी लहान मोठया गाडयापासून ते ट्रक टॅक्टर या गाडयाचे ही ते पंक्चर काढण्याचे काम करीत होते. ते प्रमाणीकपणे काम करीत असल्याने त्याच्याकडे ग्राहक ही जास्त होते. त्यातच कारखाना परिसरातील गाडया ही त्याच्याकडेच पंक्चर काढायला येत होत्या. त्यामुळे त्याच्याकडे रात्र आणि दिवस काम होते. ते मुळचे केरळ येथील कोल्लम जिल्यातील उमानुर येथील असले तरी बरीच वर्ष ते येथे राहत ...पान ६ वर

09 TO 15 SEPTEMBER 2024 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 9/6/2024 5:20 PM Page 1



पान १ वरून...

## कर्जबाजारी विनायकमुळे संसाराचे ...

याचा मेळ काही बसत नव्हता. डोक्यावर कर्जाची रक्कम वाढतच चालली होती. त्यातच विनायक यांना दारू पिण्याचे व्यसन लागले. ते रात्र आणि दिवस दारू पिऊन दारूच्या नशेत तर्र राहू लागले. दोन तीन लोकांच्याकडून परत त्यांनी उसनवारी केलेली होती. त्याचे ही ते देणे लागत होते. बँके कडून घेतलेले कर्ज खाजगी देणी यातून त्याची सुटका होणार नव्हती. त्यामुळे ते वैतागलेले होते. यातूनच त्याचे घरात पत्नी रेणुका बरोबर सारखी भांडणे होत होती. ते तिला तिच्या माहेरकडून पैसे आणुन दे आणि माझे कर्ज भागव असे सांगत होते. तिने ही सुरूवातीला शिंदोळी येथून आपली आई शोभा मंगन्नावर हिच्याकडून काही रक्कम आणली.त्यातून त्याचे काही कर्ज भागले नाही. उलट खाजगी देणे कऱ्यांनी त्याचे व्याजच त्या रक्कमेपोठी वसुल केले. कर्ज आहे तसेच राहिले. त्यासाठी विनायक यांना देणेकऱ्यांनी तगादा लावून त्यांना त्रास दयायला सुरूवात केली. त्याच्या त्रासातून सुटका होणेसाठी म्हणून विनायक हे आपले घर सोडून बाहेर कुठे तरी निघून गेले. तीन वर्षापूर्वी निघून गेलेल्या विनायक याचा पत्ता काही लागत नव्हता. ते घरात नसले तरी खाजगी सावकार आणि हातउसणे दिलेले लोक काही गप्प राहत नव्हते. ते आता त्याची पत्नी रेणुका यांना त्रास देऊन तुम्ही आमची रक्कम भागवा असे सांगून त्यांना ही त्रास देत होते. ती बिचारी बाई माणुस किती लोकांचा त्रास सहन करणार किती लोकांना तोंड देणार तिला ही त्रास वाढलेला होता. त्यामुळे ती वैतागून बऱ्याच वेळेला काही दिवसासाठी आपल्या माहेरी आईकडे जात होती. मुले ही शिक्षणासाठी दुसरीकडे असल्याने त्यांना काही त्रास नव्हता. इकडे तीन वर्षापूर्वी पळून गेलेला विनायक हा आपल्या बायकोला फोन करून मला यातून सोडव नाही तर मी जीव देतो असे म्हणत होता. पण कर्जाची रक्कमच इतकी मोठी होती की, ती त्याचे कर्ज फेडू शकत नव्हती. त्यामुळे तिने ही त्याला वैतागून सांगितले की, तुम्ही आता बाहेर गेला आहात तेथेच तुमचे काही तरी बरे वाईट होऊ दया इकडे येवून मला त्रास देऊ नका असे सांगितले. पण विनायक याने याचा वेगळाच अर्थ काढला. तो पत्नी रेणुकावर चारित्र्याचा संशय घेऊ लागला. तो तिच्या चारित्र्यावर संशय घेत असताना तो तिला म्हणू लागला की, तुझे बाहेर ज्याच्याबरोबर शारीरिक संबंध आहेत ना त्याच्याकडून तु रक्कम घे आणि माझे कर्ज भागव इतका तो हतबल झाला होता. अलिकडे पती सारखा आपल्या चारित्र्यावर संशय घेत असल्याने ती ही त्याच्यावर जाम चिडली होती. एक तर त्याने कर्जबाजारी होऊन आपल्याला व आपल्या मुलांना देशोधडीला लावले आहे आणि परत आपल्याचा चिखळात ढकलत आहे. तो सारखा तिच्या मोबाईलवर फोन लावून तु जर माझे कर्ज भागविले नाहीस तर मी तुला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी ही तिला देऊ लागला. आता ती त्याचे काहीच ऐकत नव्हती.उलट ती त्याला म्हणत होती तु तिकडेच खपललास तर बरे होईल. ती आपल्याला बाहेर काढून दुसऱ्याबरोबर मजा मारते म्हणून तो तिच्यावर नको नको ते आरोप करू लागला. त्यातच त्याने परत एकदा १९ जुलै २०२४ रोजी तिच्या मोबाईलवर मेसेज केला की, तु जर माझे कर्ज भागविणार नसशील तर मी तुला जिवंत ठेवणार नाही. तिने ही गोष्ट आपली आई शोभा मंगन्नावर हिला सांगितली. ती बिचारी ही घाबरली. आपल्या जावायाकडून आपल्या लेकीला आता धोका आहे हे तिने ओळखले. आता यातून सुटका होणेसाठी त्या मायलेकीने विचार केला की, विनायकलाच जर मारून टाकले तर कर्ज वाल्याचा तगादा ही लागणार नाही उलट घेतलेले कर्ज ही लोक आणि बॅक आपल्याला माफ करेल ही सुपीक आयडीया त्या माय लेकीच्या डोक्यात आली. त्या दृष्टीने त्यांनी विचार करायला सुरूवात केली. त्याला कसे मारायचे याचा त्या विचार करू लागल्या. गेल्या तीन वर्षापासून बाहेर गेलेला विनायक हा गेल्या अठवडयात पिरनवाडी येथे आला. तो परत आल्याचे बघून देणेकऱ्यांनी त्याच्याकडे तगादा लावला.परत तो तेथून कोणाला न सांगताच बेपत्ता झाला. दोन चार दिवसांनी म्हणजे परत गुरूवार दि.२९ ऑगस्ट रोजी रात्री तो आपल्या घराकडे दारूच्या फुल्ल नशेत आला.त्याला नीट उभे ही राहता येत नव्हते. त्यातच रेणुकाची आई म्हणजे विनायकची सासु शोभा ही त्याच्याच घरी होती. दारूच्या नशेत असलेला विनायक हा पत्नी रेणुका हिला शिव्या देत तु कोणाची रांड आहेस ते मला माहिती आहे. असे म्हणून तुझ्यामुळे मी कर्ज बाजारी झालो आणि मला परागंदा होण्याची वेळ आली. त्याच्या बोलण्याने रेणुका त्याच्यावर चिडली अगोदरच त्या मायलेकीनी दुसरा विचार केला होता. विनायकला मारले तर कर्ज तरी माफ होईल हे त्या दोघींच्या डोक्यात बसले होते. दारूच्या नशेत असणाऱ्या विनायकला मारून टाकण्याची हिच वेळ आहे हे दोघीनी ताडले. दारूच्या नशेत बडबडून विनायक हा तसाच झोपला. रात्री १.३०च्या दरम्यान रेणुका आणि तिची आई शोभा या दोघीजणी झोपलेल्या विनायक जवळ आले. रेणुकाच्या हातात नायलॉनची दोरी होती. तिने ती दोरी विनायकच्या गळ्यात जोरात आवळली. तसा विनायक हा जीव वाचविण्यासाठी धडपडू लागला. म्हणून शोभाने त्याच्या तोंडावर उशी दाबून धरली. त्यामुळे त्याचा श्वासो श्वास कोंडला गेला. त्याची जगण्याची धडपड थांबली. एवढयावरच त्या दोघी थांबल्या नाहीत तर त्यांनी त्याच्या पोटावर जोर जोरात लाथा ही मारल्या. त्यातच विनायक याचा मृत्यू झाला. त्याचा मृत्यू झाल्याचे लक्षात आल्यावर त्या दोघींनी त्याचा मृतदेह घराच्या दरवाज्यात आणून दरवाजा बंद करून जणू काही झालेच नाही अशा अविर्भात त्या दोघी झोपायला गेल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी दरवाजा उघडून रेणुका आणि तिची आई शोभा यांनी बोंब ठोकली की, रात्री कधी दारू नशेत नवरा येवून बाहेर झोपला. त्याला दारू जास्त झाल्याने त्यातच त्याचा थंडीने मृत्यू झाला. त्या दोघींच्या रडण्याने शेजारचे लोक ही त्याच्या घराकडे आले. त्यांना ही त्या दोघी खरेच सांगत आहे असे वाटले. कारण विनायक हा जास्त दारू पित होता.त्यातच घटनेच्या रात्री जास्त पाऊस असल्याने पावसात भिजून थंडीत त्याचा मृत्यू झाला असावा. त्यातच पत्नी रेणुका हिने मयत पती विनायक याच्या मोबाईलमधील सीमकार्ड ही मोडून पुरावा नष्ट केला. त्यातच लोकांनी त्याचा मृतदेह सरकारी दवाखान्यात नेला.तेथील पोस्ट मार्टम रिपोर्टमध्ये मयताचा गळा आवळून श्वास कोंडला गेल्याने मृत्यू असा उल्लेख होता. तसेच त्या पोस्ट मार्टम रिपोर्टमध्ये मयत विनायकला मारहाण झाल्याचे नमुद होते.नेमकी ही गोष्ट डॉक्टरांना खटकल्याने त्यांनी याची माहिती बेळगावी ग्रामीण पोलीस स्टेशनला दिली. तर या उलट रेणुका हिने आपल्या नवऱ्याचा मृत्यू संशयास्पद झाल्याची तक्रार नोंदविली. त्यामुळे सरकारी दवाखान्यात पोलिसांनी येवून मृतदेह पाहिल्यावर त्याचा ही संशय बळावला. त्यांनी संशयावरून मयत विनायक याची पत्नी रेणुका आणि तिची आई शोभा याच्याकडे चौकशी करायला सुरूवात केली त्यावेळी त्या दोघींच्या बोलण्यात त्यांना विसंगती जाणवत होती. महिला पोलीसाकरवी रेणुका हिला बोलते केले असता तिने आपला गुन्हा कबुल केला. तिने गुन्हा कबुल केल्यानंतर तिच्या आईने ही गुन्हा कबुल केला. फिर्यादीच या घटनेतील मुख्य संशयीत आरोपी निघाल्याने पोलीसांचे काम ही सोपे झाले. सोपस्कर पुर्ण केल्यानंतर पोलिसांनी विनायक नामदेव जाधव (वय ४८) याच्या खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी त्याची पत्नी रेणुका विनायक जाधव (वय ४२) आणि तिची आई शोभा शिवाजी मंगान्नवर (वय ६५) रा.शिंदोळी याच्या विरोधात आयपीसी कलमाप्रमाणे बेळगावी ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद केला. या दोघींना ही पोलीसांनी बेळगावी येथील प्रथमवर्ग न्यायलयात हजर केले असता. मा.न्यायालयाने त्याची रवानगी हिंडलगा जेलमध्ये केली. या दरम्यान पोलिसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली नायर्लानची दोरी आणि उशी जप्त केली.

## बाप काढल्याने बाचाबाची झाली...

शिव मंदिरात जमा होतात. फत्तेपूरमधील सावंत पवार आणि अमोदामधील पवन होमसिंग चौधरी हे आपापल्यासहकाऱ्यांसमवेत शिव मंदिरात जमत असत. कालांतराने शिव मंदिरात जमणाऱ्या या तरूणांमध्येकमी वेळात, कमी श्रमात, बिना भांडवलात धनसंपत्ती गोळा करण्याची इच्छा निर्माण झाली. सुरूवातीला या मंदिरात जमणारे हे टोळभैरव एकत्रित गुन्हे करायचे, पण जसे त्यांच्यावर गुन्हे दाखल होऊ लागले तसतशी त्याची झळ त्यांना बसू लागली, तेंव्हा त्यांच्यात वाद निर्माण होऊ लागले. याच वादातून सावंत पवार आणि पवन चौधरी यांचे दोन गट पडले आणि ते दोघे त्यांच्या गटाचे म्होरके झाले. आपल्या काळ्या कृत्यांनी इतरांवर, गावा- गावात दहशत निर्माण करता-करता सावंत पवार आणि पवन चौधरी यांची गँग एकमेकांवर कुरघोडी करून एकमेकांवर दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करू लागल्यामुळे त्या दोन टोळ्यांमध्ये वैमनस्य निर्माण झाले. त्यातून त्या दोघात कारणपरत्वे सशस्त्र संघर्ष होऊ लागले. परिणामत: म्हसावद पोलीस स्टेशन अंतर्गत ग्रामीण भागात या गावगुंडांची दहशत निर्माण झाली. बुधवार दिनांक १२ जून २०२४ रोजी रात्री फत्तेपूर-अमोदा परिसरातील नदी किनारी असलेल्या शिवमंदिर परिसरात अमोद्याचे पवन होमसिंग चौधरी हा आपल्या सबंगडचासह मद्यधुंद अवस्थेत बसला होता. त्यादरम्यान शिव मंदिर परिसरातून फत्तेपूरचा सावंत पवार, विकास पटेल आणि अनिल वळवी हे तिघे जण मोटरसायकलने मडकाणीकडे जात होते, तेंव्हा मंदिराच्या ठिकाणी बसलेल्या पवन होमसिंग चौधरी याने सावंत पवार याला हटकले. 'या परिसरातून तू का ये-जा करतो?' असा प्रश्न केला.'का बरं?हा रस्ता तुझ्या बापाचा आहे का?' या शब्दात सावंत पवार याने पवन चौधरीला प्रतिप्रश्न केला, त्यावरून त्या दोघांमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. सावंत पवार हा बेसावध होता. त्याच्याबरोबर केवळ दोन सहकारी होते आणि तेही निःशस्त्र होते. पवन चौधरी सोबत त्याचे अकरा साथीदार होते आणि त्यांच्याजवळ धारदार - कोयता वगैरे शस्त्रे होती. प्रसंगावधान राखून सावंत पवारने आपल्या मोटरसायकलने घटनास्थळावरून पळ काढला. इकडे सावंत पवार बरोबरचे दोन सहकारी विकास पटेल आणि अनिल वळवी हे आपला जीव वाचवण्याचा प्रयत्न करत होते. घटनास्थळावरून पळ काढून सावंत पवार हा परिसरात दबा धरून बसला होता. काही वेळाने सावंत पवार आपल्या दोघा सहकाऱ्यांना घेऊन व जाण्यासाठी घटनास्थळावर आला. पण तो येताच पवन चौधरी आणि त्याच्या सहकाऱ्यांनी त्याला घेरून बेदम चोपले. त्यात तो अर्धमेला झाला. गलितगात्र झालेल्या सावंत पवार, विकास पटेल, अनिल चळवी या तिघांना पवन चौधरी आणि त्याच्या सहकाऱ्यांनी एका क्रमांक नसलेल्या बोलेरो या वाहनात बसवून मडकाणी येथील विकास पवार याच्या घरासमोरील मोकळ्या मैदानात आणले. त्या तिघांना गाडीतून बाहेर काढून पुन्हा बेदम चोप दिला. तिघे जण अर्धमेल्या अवस्थेत जमिनीवर कोसळले. यादरम्यान रात्रीची गस्त देणारे म्हसावद पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक जितेंद्र पाटील हे आपल्या सहकाऱ्यांसह त्या परिसरातून जात होते. त्यांना सावंत पवार, विकास पटेल आणि अनिल वळवी जखमी अवस्थेत जमिनीवर पडलेले दिसले. त्या तिघांच्याकडे विचारपूस केली असता ते तिघे जण बोलण्याचा मनस्थितीत नव्हते. उपनिरीक्षक जितेंद्र पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिसरातील नागरिकांना झोपेतून उठवून घटनेबाबत विचारपूस केली, तसेच जखमी अवस्थेतील तिघांना मदत करण्यासाठी विनंती केली, पण पवन चौधरी आणि त्यांच्या टोळीची एवढी दहशत त्या परिसरात आहे की सर्वांनी कानावर हात ठेवले आणि माहिती देण्यास असमर्थता दर्शवली. गंभीर जखमी अवस्थेतील सावंत पवार व त्याच्या दोघा साथीदारांना औषधोपचारासाठी रूग्णालयात नेणे गरजेचे होते, त्यासाठी उपनिरीक्षक जितेंद्र पाटील यांनी रूग्णवाहिकासाठी फोन केला, पण कोणी फोन उचलत नव्हते. बाट पहात बसलो तर त्यांना वेळेवर औषधोपचार मिळणार नाही हे लक्षात घेऊन उपनिरीक्षक जितेंद्र पाटील यांनी तिघा गंभीर जखमींना आपल्या पोलीस व्हॅनमध्ये घेतले आणि म्हसावद येथील ग्रामीण रूग्णालयात नेले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्या तिघांवर प्राथमिक स्वरूपाचा औषधोपचार केला, पण तिघांची त्यातल्या त्यात सावंत पवार याची नांजूक स्थिती लक्षात घेता त्याला तातडीने नंदूरबार येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात नेहमी गरजेचे असल्याचे म्हसावद येथील वैदयकीय सूत्राने सांगितले. त्यानंतर उपनिरीक्षक जितेंद्र पाटील यांनी तिघांना आपल्या पोलीस व्हॅनमधून नंदूरबार शासकीय रूणालयात तातडीने नेण्याची व्यवस्था केली. पवन चौधरी व त्याच्या साथीदारीने सावंत पवार, विकास पटेल आणि अनिल वळवे यांच्यावर प्राणघातक शस्त्राने जीवघेणा हल्ला केला होता, न त्यामुळे तिघेही गंभीर जखमी झाले होते. सावंत पवार यांचे पोट फाटले होते. डोळ्यावर खोलवर घाव बसला होता. तो प्रवासादरम्यान मृत्यूशी संघर्ष करत होता. भरधाव वेगाने तिघांना नंदूरबार येथील जिल्हा शासकीय जिल्हा शासकीय रूग्णालयात नेत असतांना रूग्णालयाच्या नजीक जाताच सावंत पवार याची प्राणज्योत मालवली. सावंत पवार याच्या दोघा साथीदारांना जिल्हा शासकीय रूग्णाला दाखल करून सावंत पवार याचा मृतदेह घेऊन म्हसावद पोलीस म्हसावदला आले. त्यांनी सावंत पवार यांचा मृतदेह पोस्टमार्टमसाठी म्हसावद येथील ग्रामीण रूग्णालयात जमा केला. इकडे सावंत पवार याच्या खुनाची वार्ता परिसरात पसरताच आदिवासी बांधवांचा मोठा जमाव म्हसावद पोलीस स्टेशनवर चालून आला. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रावण दत्ता यांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी परिसरातील शांतता व सुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनासाठी संयुक्तिक आदेश जारी केला. य पोलीस अधीक्षक श्रावण दत्ता यांचा आदेश मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे निरीक्षक किरणकुमार खेडकर, शहादा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शिवाजीराव बुधवंतआदीजण तात्काळ म्हसावद पोलीस स्टेशनला डेरेदाखल झाले. म्हसावद पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजन मोरे व उपनिरीक्षक जितेंद्र पाटील यांनी आपल्या फौजफाट्यासह परिस्थिती नियंत्रणात ठेवली होती, परंतु सावंत पवार याच्या नातेवाईकांची आक्रमकता व आदिवासी बांधवातील तीव्र असंतोष लक्षात घेता जिल्हा पोलीस अधीक्षक श्रावण दत्ता यांच्या आदेशाने अप्पर पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक किरणकुमार खेडकर, शहादा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शिवाजीराव बुधवंत यांच्यासह उपस्थित पोलिसांच्या फौजेने फत्तेपूर-अमोदा आणि मडकाणी आणि परिसरात रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून खडा पहारा दिला. सावंत पवार आणि आदिवासी बांधवांच्या आप्तस्वकीयांनी म्हसावद पोलीस स्टेशनच्या आवारात ठाण मांडले. सावंत पवार याच्या मारेकऱ्यांना अटक करून गुन्हे नोंदवत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, त्याच्यावर अंत्यसंस्कार करणार नाही असा पवित्रा घेतला होता. अधीक्षक श्रावण दत्ता यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक निलेश तांबे, स उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार यांनी आंदोलकांना विश्वासात घेऊन संशयितांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे आश्वासन दिले. एवढेच नव्हे तर सर्व संशयित गुन्हेगारांवर खुनाचा गुन्हां दाखल केला असे सांगितले, त्यामुळे सावंत पवार याच्या नातेवाईकांनी व आंदोलकांनी नरमाईची भूमिका घेतली. पोस्टमार्टमनंतर सावंत पवार याचा मृतदेह ताब्यात घेऊन फत्तेपूरमध्ये शोकाकुल वातावरणात त्याच्यावर अंत्यसंस्कार केले. मुंबईसारख्या मोठ्या शहरांत होणाऱ्या गँगवॉरची प्रथा आता फत्तेपूर-अमोदा-मडकाणीसारख्या आदिवासी बहुल गावात होऊ लागल्याने पोलिसांची डोकेदुखी वाढू लागली आहे. पवन चौधरी यांच्या नेतृत्वाखाली टोळी रावण गँग म्हणून या परिसरात प्रसिद्ध असून या टोळीची या परिसरात खूप दहशत आहे. शिव मंदिरासमोर आणि मडकाणी येथील विकास पवार याच्या घरासमोर पवन होमसिंग चौधरी, विकास कृष्ण पवार, गणेश राजपूत, जीवन होमसिंग चौधरी, मोहन सोमा चौधरी, संदीप संजय वळवी, नयन सुजित शेवाळे आणि राहुल मोतीलाल पाडवी या सर्वांनी सावंत पवार, विकास पटेल आणि अनिल वळवी या तिघांना एखाद्या चित्रपटातील दृश्याप्रमाणे घेरून बेदममारहाण केली. त्यात सावंत पवार गतप्राण झाला. विकास पाटील आणि अनिल वळवी रूग्णालयात उपचार घेत आहेत. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार आणि अप्पर पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हाअन्वेषण विभागाचे सहकार्य घेत म्हसावद पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजन मोरे आणि उपनिरीक्षक जितेंद्र पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी सदर वृत्तांत शब्दबद्ध होईपर्यंत जीवन हमसिंग चौधरी, मोहन सोमा चौधरी, संदीप संजय वळवी, नयन सुजित शेवाळे आणि राहुल मोतीलाल पाडवी यांना अटक करून गजाआड केले आहे. या प्रकरणातील मास्टरमाईंड रावण गँगचा म्होरक्या पवन होमसिंग चौधरी, तसेच विकास कृष्ण पवार, गणेश राजपूत, बंटी मडकाणी, सागर चौधरी हे अद्याप फरार आहेत.पोलिसांचे शोध पथक त्यांच्या मागावर आहे.

## प्रेमीकाच्या चारित्र्याचा त्याला संशय ...

केल्या आलाच नाही. त्यामुळे तिने देखील त्याची परत येण्याची आशा सोडून दिली. स्वत:सह मुलांच्या पालणपोषणासाठी तिने या कालावधीत कंबर कसली. मोलमजूरी करुन ती तिचा आणि मुलांचा उदरनिर्वाह करु लागली. जामनेर तालुक्यातील शहापूर या गावी ती मुलांसह रहात होती. एकटी महिला कधी कधी टवाळखोरांच्या नजरेचे साहजीकच लक्ष्य आणि कधी कधी भक्ष्य देखील ठरते. शहापूर या गावात दोन मुलांसह राहणारी संगिता आता ३६ वर्षाची झाली होती. दोन मुलांची आई पतीविना रहात असल्याचे नजीकच्या तळेगाव येथे राहणाऱ्या किरण संजय कोळी याच्या नजरेने हेरले. तळेगाव येथे राहणाऱ्या किरण कोळी याने संगिता या विवाहितेसोबत संपर्क साधला. हळू हळू त्याने तिच्यासोबत सलगी वाढवण्यास सुरुवात केली. त्याच्या बोलण्यावर संगिता भाळली. त्याच्या गोड बोलण्यावर विश्वास ठेवत ती देखील त्याच्यासोबत बोलू लागली. अधूनमधून तिच्याजवळ येणारा किरण कोळी आता नेहमी नेहमी येऊ लागला. बघता बघता दोघांचा सहवास वाढला. सहवासातून दोघात प्रेम वाढीस लागल्याचे गावात म्हटले जावू लागले. दोघांमधे प्रेमसंबंध निर्माण झाल्याचे लोक बोलू लागले. तो तिच्या भेटीसाठी तिच्या घरी येत असतो हे तिच्या भावासह गावातील लोकांना माहिती होते. दोघांच्या भेटीगाठी गावकऱ्यांसाठी नवलाईची गोष्ट राहिली नव्हती. सुरुवातीला दोघांमधील चांगले संबंध गेल्या काही दिवसांपासून तणावाचे होण्यास सुरुवात झाली. किरण तिच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागल्याचे म्हटले जाऊ लागले. सुरुवातीला संगितासोबत व्यवस्थित बोलणारा किरण आता हिंसक वृत्तीने तिच्यासोबत व्यवहार करु लागला. त्यातून तो तिच्यासोबत वाद घालू लागला. दोघांमधील वाद कधी कधी विकोपाला जाऊ लागला. अखेर तो दिवस जवळ आला आणि किरणच्या हातून तिला देवाघरी जाण्याची वेळ आली. १ जुलै २०२४ चा दिवस उजाडला. अकरा वाजण्यापुर्वी संगिता रहात असलेल्या पत्र्याच्या घरात किरण आला. त्यावेळी तिचा मुलगा अजय हा देखील घरी हजर होता. बघता बघता दोघांमधील वाद विकोपाला गेला. तिच्यावर संशय घेणाऱ्या किरणने तिला दांड्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्याने तिच्या डोक्यात दगडाचा घाव घातला. दगडाच्या घावात संगिता जागीच रक्ताच्या थारोळ्यात पडून मरण पावली. आपल्या हातून संगिता मरण पावल्याचे दिसताच किरण मनातून घाबरला. त्यानेघटनास्थळावरुन पलायन केले. हा सर्व प्रकार संगिताचा मुलगा अजय बघत होता. या दरम्यान संगिताचा भाऊ धनराज शंकर वडार हा शेतात गेला होता. आपली बहिण संगिता हिला संतापाच्या भरात तळेगाव येथील किरण कोळी याने दगडाच्या घावात ठार केल्याचे मुकादम अरुण भिल याच्याकडून धनराजला समजले. त्यामुळे त्याने घाईघाईत संगिता रहात असलेले शहापुर येथील घर गाठले. घटनास्थळी येताच त्याला समोर रक्ताच्या थारोळ्यात पडलेला बहिण संगिताचा मृतदेह आढळून आला. तिच्या डोक्यात दगड टाकल्याचे त्याला दिसून आले. जवळच उभा असलेला त्याचा भाचा, संगिताचा मुलगा अजय याने त्याला घडलेली हकीकत कथन केली. दरम्यान या घटनेची माहिती जामनेर पोलिस स्टेशनला समजली. जामनेर पोलिस स्टेशनचे कर्तव्यदक्ष, तडफदार पोलिस निरीक्षक किरण शिंदे यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत घटनास्थळ गाठले. मयत संगिता शिंदे हिच्या मृतदेहासह घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला. तिचा मृतदेह उत्तरीय तपासणीकामी रुग्णालयात रवाना करण्यात आला. मयत संगिताचा भाऊ धनराज वडार याने दिलेल्या फिर्यादीनुसार जामनेर पोलिस स्टेशनला फरार संशयीत किरण संजय कोळी याच्याविरोधात खूनाचा गुन्हा दाखल केला. दरम्यानच्या कालावधीत फरार किरण कोळी याच्या शोधार्थ पोलिसांचे पथक पो.नि. किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली रवाना झाले. गु.र.न. ३२३/२४ बीएनएस १०३ नुसार हा खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. नव्याने लागू झालेल्या भारतीय न्याय संहितेनुसार जळगाव जिल्ह्यात हा पहिलाच गुन्हा नोंद करण्यात आला. फरार किरण कोळी यास तळेगाव परिसरातून शिताफीने अटक करण्यात आली. या गुन्ह्याचा पुढील तपास कर्तव्यदक्ष पो.नि.किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

## जुगाराचे व्यसन बर्बादीचे कारण...

आला होता. गळा चिरून त्यांची हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र बिंद यांची हत्या कुणी आणि का केली त्याचा कसलाच दुवा सापडत नव्हता. मयत बिंद याचे कुणाशी वैमनस्य नव्हते. त्यांच्या मोबाईलच्या तपशिलातही काही संशयास्पद आढळून आले नाही. त्यामुळे पोलिसांपुढे मोठे आव्हान निर्माण झाले होते. या प्रकरणी पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख यांचे पथक तपास करत होते. पोलिसांनी वेगवेगळ्या पध्दतीने तपास करून उत्तर प्रदेशाच्या वाराणसी जिल्ह्यातील कछवा चौरहा येथून समीरकुमार उर्फ समशेर बच्चालाल बिंद (२३) याला अटक केली. जुगारासाठी पैसे नसल्याने केली हत्या समशेर बिंद हा मयत प्रमोद कुमार बिंद याचा दुरचा नातेवाईक होता. त्याला जुगाराचे व्यसन होते. त्यासाठी त्याने मोटारसायकलही गहाण ठेवली होती. ती सोडविण्यासाठी त्याला पैसे हवे होते. त्यामुळे तो नालासोपारा येथे राहणारे त्याचे नातेवाईक प्रमोदकुमार बिंद यांच्या घरी आला. २३ ऑगस्टच्या रात्री दोघांनी एकत्र जेवण करून झोपले.

मध्यरात्री समशेर झोपेतून उठला आणि त्याने स्वयंपाकघरातील चाकून प्रमोद कुमार बिंद यांच्यावर वार करून हत्या केली. यावेळी घरात असलेले ४४ हजार रुपये घेऊन तो पळून गेला. चोरलेले पैसे देखील नंतर तो जुगारात हरला होता. गुन्हे शाखा ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोपान पाटील, पोलीस उपनिरीक्षक उमेश भागवत, ज्ञानेश्वर आव्हाड, अशोप पाटील, मनोज चव्हाण, सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बावरकर, अश्वीन पाटील आदींच्या पथकाने या अशक्यप्राय वाटणार्या गुन्ह्याची उकल करून आरोपीला अटक केली.

## दुहेरी हत्याकांडाचा पोलिसांकडून पर्दाफाश...

व त्याचा मृतदेह कर्नाळा येथील अभयारण्यात टाकून दिला होता. अमिरच्या हत्येत आपले नाव येऊ नये व आपला सहभाग आढळून येऊ नये तसेच पोलिसांना गुंगारा देण्यासाठी हत्येत सहभागी झालेला दुसरा इस्टेट एजंट सुमित जैन याने स्वतःच्या पायावर खोपोली येथे गोळी मारुन घेतली होती. मात्र स्वतःला जखमी करण्याच्या नादात सुमित जैन याच्या शरिरातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. या दरम्यान हत्येच्या सुपारीचे कबूल केलेले ५० लाख रुपये कधी देणार या वादात मारेकऱ्यांनी सुमित जैनच्या पायावर आणि शरिरावर चाकूने वार केले. यामध्ये सुमित जैन याचा देखील मृत्यू झाला. दरम्यान, दोन्ही रिअल इस्टेट एजंटच्या मिसिंगची तक्रार २२ ऑगस्ट रोजी नेरुळ पोलिस ठाण्यात दाखल झाल्यानंतर पोलिसांनी दोघांचा शोध सुरु केला. यादरम्यान पोलिसांना आरोपींची कार खोपोली येथे बेवारस स्थितीत आढळुन आली. सदर कारमध्ये पोलिसांना दोन बंदुकीच्या पुंगळ्या आणि रक्ताचे डाग आढळून आल्यानंतर पोलिसांनी या घटनेचा तपास अधिक जोमाने सुरु केला. त्यानंतर सुमित जैन या इस्टेट एजंटचा मृतदेह खोपोली-पेण मार्गावरील गागोदे गावाजवळ सापडला. परंतु, अमिर खानजादा याचा थांगपत्ता लागत नसल्यामुळे पोलिसांनी आपली शोध मोहिम अधिक तीव्र करुन या हत्येचा मास्टरमाईंड असलेला आरोपी विठ्ठल नाकाडे (४३) याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर विठ्ठल नाकाडे याने सुमित जैन याच्यासह संगनमत करुन अमिर खानजादा याचा काटा काढण्यासाठी ५० लाख रुपयांची सुपारी दिल्याची कबुली पोलिसांना दिली. सदर हत्येचे नियोजन करण्यासाठी सुमित जैन व नाकाडे यांची ठाण्यातील व्हिव्हियाना मॉलमध्ये २० ऑगस्ट रोजी मिटिंग देखील झाल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर पोलिसांनी या दुहेरी हत्याकांडात सहभागी असलेले आरोपी जयसिंग मुदलीयार (३८) बदलापूर, आनंद क्रूझ (३९)नेरुळ, वीरेंद्र कदम (२४) कांजुरमार्ग, अंकुश सिताफे (३५) उल्हासनगर यांना ताब्यात घेतल्याचे अप्पर पोलीस आयुक्त दिपक साकोरे यांनी सांगितले.

मृत सुमित जैन व आरोपी विठ्ठल नाकाडे यांनी पाली येथील एका साडेतीन एकर जमीनीचा सौदा केला होता. सदर जमिनीचा मूळ मालक कोवीडमध्ये मृत झाला असल्याने एका बनावट व्यक्तीला जमीनीचा मालक म्हणून उभा करुन व जमीनीचे खोटे कागदपत्रे बनवून सदर जमीन साडेतीन कोटीला एका व्यक्तीला त्यांनी विकली होती. या बनावट व्यवहाराची माहिती आमिर खानजादा याला समजल्यानंतर त्याने पण या व्यवहारात आपल्याला हिस्सा पाहिजे अशी मागणी जैन व नाकाडे यांच्याकडे केली होती. या व्यवहारात जमीन खरेदीदाराने ६० लाख व ९० लाखाचे दोन चेक सुमित जैन यांच्याकडे दिले होते. त्यापैकी ६० लाखांचा चेक वाटल्यानंतर त्या रक्कमेची वाटणी करण्यात आली. मात्र, जमीन खरेदीदाराला या व्यवहारात संशय आल्याने त्याने ९० लाखांच्या चेकचे पेमेंट थांबविले. सदर माहिती अमिर खानजादा याने दिल्याचा संशय आल्याने सुमित जैन व विठ्ठल नाकाडे यांनी अमिर खानजादाचा काटा काढण्याचे ठरवून त्याला एका जागेच्या व्यवहाराच्या निमित्ताने २१ ऑगस्ट रोजी घेऊन गेले. प्रथमदर्शनी हे हत्याकांड जमीनीच्या व्यवहारातील आर्थिक देवाणघेवाणीवरुन झाले असल्याचे दिसत असले तरी या हत्याकांडाचा पुढील तपास सुरु असून फरार आरोपीचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती पोलिस उपायुक्त पंकज डहाणे यांनी दिली.

क्राईम Reporter
क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच
पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर
प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या
शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.
9890718873

साप्ताहिक क्राईम संध्या ऑनलाईनही वाचता येईल....
www.crimesandhya.com

09 TO 15 SEPTEMBER 2024 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 9/6/2024 5:21 PM Page 1



### वाडा तालुक्यातील नेहरोलीतील तिहेरी हत्येचा लागला छडा

# पैशांसाठी भाडेकरूनेच केली हत्या; उत्तर प्रदेशातून अटक






**वाडा/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील नेहरोली येथे बंद घरात तिघांचे मृतदेह आढळून आले होते. या तिघांवर रॉडने वार करून हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले. अधिकृत सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तालुक्यातील नेहरोली येथील बोंद्रे आळी या ठिकाणी राहणारे मुकुंद बेचलदास राठोड (७०) हे नेहरोली येथे २५ वर्षापासून राहत आहेत. त्यांचे दोन मुलगे मुंबई येथे राहतात. आठ दिवसांपासून वडिल आई आणि बहिणीचा संपर्क न झाल्याने त्यांचा मुलगा सुहास हा शुक्रवार (दि.३०) दुपारी नेहरोली येथे आला. घराला कुलूप बघून शेजारी चौकशी केली असता काही माहिती मिळाली नाही. शेवटी घराचे कुलूप तोडून घरात गेला असता त्याला दुर्गंधीचा वास आला. थोडा पुढे गेल्याने बाथरूमच्या दरवाज्यात वडिलांचा मृतदेह आढळला. त्यानंतर त्यांनी सरळ वाडा पोलीस स्टेशनला जाऊन या संदर्भात माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देताच घरात पत्र्याच्या पेटीमध्ये आई आणि मुलीचा मृतदेहही आढळला. ही घटना होऊन बरेच दिवस झाल्याने प्रेताला दुर्गंधी सुटली होती. मुकुंद बेचलदास राठोड हे नेहरोली येथे २५ वर्षापासून स्थायिक झाले होते. त्यांनी स्वतः जागा घेऊन एक इमारत बांधली होती . इमारतीत भाडेकरू सह स्वतः तेही एका ब्लॉकमध्ये राहायचे पत्नी आणि मुलगी यांच्या समवेत ते राहत होते. परंतु, भाडेकरूनेच या घरात पैशांचे घबाड असेल या उद्देशानेच या हत्या केल्याचे तपासात उघडकीस आले असून आरोपीला उत्तर प्रदेशातून अटक केली आहे. या घरात राहणारा भाडेकरू हा उत्तर प्रदेशातील असून या घरात पैशांचे घबाड मिळेल या उद्देशाने त्याने सर्वप्रथम मुलगी संगिता हिच्या डोक्यावर रॉडने वार करून तिला गंभीर जखमी केले. त्यानंतर कांचन हिच्या डोक्यात रॉडने वार करून दोघींनींहा ठार करून त्यांना बंद पेटीत ठेवून त्यांची विल्हेवाट लावली. त्यानंतर मुकुंद हे बाहेर गेले असल्याने तेही घरी पोहचले. आरोपी दबा धरुन घरातच बसला होता. त्यानंतर मुकुंद यांच्यावर पण रॉडने वार करून त्यालाही ठार करून तेथून पोबारा केला. या गुन्ह्याच्या तपासासाठी वाडा पोलिसांची पाच पथके रवाना झाली होती. अखेर उत्तर प्रदेशातून आरोपीला ताब्यात घेतले असून गुरूवारी (ता.५ सप्टेंबर) सायंकाळी पालघर येथील पोलीस अधीक्षक पत्रकार परिषद घेऊन या गुन्ह्याची माहिती देणार असल्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांनी सांगितले.

# ठाणे जिल्ह्यात मलेरिया आणि डेंग्युची साथ; अतिसार, स्वाईन फ्लु व लेप्टोचे रुग्ण आढळले

**ठाणे/प्रतिनिधी**



यंदाच्या पावसाळ्यात म्हणजेच गेल्या दोन महिन्यांत ठाणे जिल्ह्यात मलेरिया आणि डेंग्यु अशा आजारांची साथ पसरली असून गेल्या दोन महिन्यात मलेरियाचे ६५३ तर, डेंग्युचे ५०५ रुग्ण आढळून आलेले आहेत. ठाणे महापालिका क्षेत्रात मलेरिया, डेंग्युसोबतच अतिसाराचे १०६, स्वाईन फ्लु २७ आणि लेप्टो ६ रुग्ण आढळून आलेले आहेत. यामुळे जिल्ह्यात साथीच्या आजारांनी डोके वर काढल्याचे चित्र आहे. पावसाळ्याच्या काळात मलेरिया, अतिसार, डेंग्यु, स्वाईन फ्लू, लेप्टो असे साथीचे आजार डोके वर काढतात. या आजारांची साथ पसरू नये म्हणून आरोग्य विभागाकडून विविध उपाययोजना करण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून महापालिका तसेच जिल्हा प्रशासनाकडून जनजागृती अभियान राबविण्यात येते. यामध्ये भिती पत्रकाद्वारे साथीचे आजार रोखण्यासाठी काय काळजी घ्यावी, याविषयी जनजागृती करण्यात येते. त्याचबरोबर शहरात धूर आणि औषध फवारणी करण्यात येते. घरोघरी साठवणूक ठेवलेल्या पाण्याची तपासणी करण्यात येते. त्यात डासांच्या आळ्या आढळून आल्यास त्या नष्ट करण्यात येतात. यंदाही अशा उपाययोजना राबविण्यात आल्या असल्या तरी जिल्ह्यात साथीच्या आजारांनी डोके वर काढल्याचे चित्र दिसून येत आहे. ठाणे जिल्ह्यात गेल्या दोन महिन्यात २ लाख ६ हजार २८८ रुग्णांची रक्त तपासणी करण्यात आली. यामध्ये ६५३ रुग्णांना मलेरिया झाल्याचे तपासणीत समोर आले. यातील जुलै महिन्यात २८४ तर, ऑगस्ट महिन्यात ३६९ रुग्ण आढळून आलेले आहेत. तर, १ हजार ४८६ डेंग्यु संशयित रुग्णांची रक्त तपासणी करण्यात आली. यामध्ये ५०५ रुग्णांना डेंग्युची लागण झाल्याचे उघडकीस आले. यामध्ये जुलै महिन्यात २५० तर, ऑगस्ट महिन्यात २५५ रुग्ण आढळून आलेले आहेत. रुग्ण संख्येची आकडेवारी लक्षात घेता ऑगस्ट महिन्यात मलेरिया आणि डेंग्यु रुग्ण संख्येत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्या तीन महिन्यात २४९ मलेरियाचे रुग्ण आढळून आलेले आहेत. या रुग्ण संख्येत जुलै महिन्यापासून वाढ होऊ लागली असून जुलै महिन्यात ९३ तर, ऑगस्ट महिन्यात १३५ रुग्ण आढळून आलेले आहेत. अतिसाराचे रुग्ण जुन महिन्यात २१२, जुलै महिन्यात ३३६ आणि ऑगस्ट महिन्यात १०६ रुग्ण आढळले आहेत. डेंग्युचे जुन महिन्यात ९, जुलै महिन्यात ३१ आणि ऑगस्ट ३८ रुग्ण आढळून आलेले आहेत. कावीळचे जुलै महिन्यात ३ रुग्ण आढळून आलेले असून ऑगस्ट महिन्यात एकही रुग्ण आढळलेला नाही. स्वाईन फ्लुचे जुन महिन्यात ८, जुलै महिन्यात १३३ आणि ऑगस्ट महिन्यात २७ रुग्ण आढळून आलेले आहेत. लेप्टोचे जून महिन्यात १, जुलै महिन्यात २३ आणि ऑगस्ट महिन्यात ६ रुग्ण आढळून आलेले आहेत.

# शालेय व्यवस्थापन समितीचे नवे अध्यक्ष हुकूमत शेख यांचा सत्कार; तर मु.अ.धुप्पे यांना देण्यात आला निरोप!



**देवणी/प्रतिनिधी**

वाढवणा बु. येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत नुकतीच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष पदी वार्ताहर हुकूमत शेख यांची निवड झाल्यामुळे केंद्रीय प्राथमिक शाळेत दि.३० ऑगस्ट शुक्रवार रोजी केंद्रातर्गत येणाऱ्या सर्व गावातील शाळेतील शिक्षकांची शिक्षण परिषद केंद्रीय शाळेत आयोजित करण्यात आली होती. यावेळी किनी, डांगेवाडी, केसगरवाडी, वाढवणा खुर्द, वाढवणा बु.कन्या प्रशाला, मुलांची प्रशाला, अडोलवाडी, उमरगा मन्ना आदि गावाच्या शाळेतील मु.अ. शिक्षक उपस्थित होते. शिक्षण परिषदेचा औचित्य साधुन नुकतीच केंद्रीय प्राथमिक शाळेत नुकतीच निवड झालेले अध्यक्ष वार्ताहर हुकूमत शेख यांचा सत्कार केंद्र प्रमुख खेळगे यांच्या हस्ते केंद्रीय प्राथमिक शाळेत करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष रशीद धावडे यांचा सत्कार शिक्षक वाकळे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच मु अ धुप्पे याचीं बदली झाली. त्यामुळे त्यांचा देखील मु.अ.जाकीर तांबोळी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिक्षिका कोरे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मुख्याध्यापक अडोळवाडी नकुरे यांचा सत्कार करण्यात आला.

शिक्षण परिषदेचे व अध्यक्ष मुख्याध्यापक जाकीर तांबोळी होते तर प्रमुख पाहुणे म्हनून केंद्र प्रमुख ए.व्ही. खेळगे, मु अ.धुप्पे होते. यावेळी शिक्षक वाकळे, भास्कर जाधव, भालके, दुर्रानी, घोडके, बिरादार तरवडे, महिला शिक्षिका, कोरे, रेणापुरे, केसगिरे आदि शिक्षक मुख्याध्यापक उपस्थित होते प्रास्ताविक व आभार प्रदर्शन शिक्षक रामचंद्र देमगुंडे यांनी मानले कार्यकम संपल्यावर लगेच भोजनाचा अस्वाद घेतला.

# निलंगा येथे महाविकास आघाडीचे छ.शिवाजी महाराज चौकात ‘रास्ता रोको’

**देवणी/प्रतिनिधी**



सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथील राजकोट किल्याजवळ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा कोसळल्या प्रकरणी निलंगा महाविकास आघाडी कडून प्रदेश सचिव अभय साळुंके यांचे पुढाकारातून निलंगा येथे रास्ता रोको करून निषेध व्यक्त करत कामात कमिशन खाणाऱ्या व निष्कृष्ट दर्जाच्या काम मार्गी लावणाऱ्या निर्लज्ज लोकप्रतिनिधीचा व अधिकाऱ्यांचा निषेध करण्यात आला. यावेळी बोलताना प्रदेश सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर म्हणाले की, सिंधुदुर्गातील मालवण येथील राजकोट किल्लयावर उभारलेला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे उद्घाटन प्रधानमंत्री मा.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ४ डिसेंबर २०२३ रोजी करण्यात आले होते. त्याठिकाणी बसविण्यात आलेला महाराजांचा पुतळा एक वर्षही पुर्ण न होता कोसळला. यावरून पुतळ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले होते हे उघड आहे. देशाचे पंतप्रधान जेंव्हा एखाद्या स्मारकाचे तथा वास्तूचे उद्घाटन करतात तेंव्हा त्याचे काम दर्जेदारच असेल अशी जनतेला खात्री असते. परंतु सिंधुदुर्गातील मालवण येथील राजकोट किल्ल्यावर उभारलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा वर्षभरातच कोसळला. हा छत्रपती शिवरायांचा अवमान आहे. याची जबाबदारी हा पुतळा उभारणाऱ्या संस्थेबरोबर संबंधित खात्याचे मंत्री व प्रधान सचिवांची देखील आहे त्यामुळे याची एसआयटी नेमून चौकशी झाली पाहिजे. याप्रसंगी प्रदेश सचिव अभय साळुंखे म्हणाले की, देशातील व राज्यातील भ्रष्ट सरकारला उखडून टाकण्यासाठी लोकसभेच्या निवडणुकीप्रमाणे विधानसभेच्या निवडणुकीतही परिवर्तन करावे शहरातील व्यापाऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल केलेल्या दुटप्पी लोकप्रतिनिधी व प्रशासनावर टीकेची झोड उडविली.तसेच आपला शेतकरी संकटात अडकलेला आहे शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही त्यासाठी सरकारने लक्ष घालून सोयाबीनला ९०००/- भाव द्यावा व हमीभावाने खरेदी करावी अशी त्यांनी मागणी केली. यावेळी शिवसेनेच्या वतीने शोभाताई बेंजरगे, शिवसेना ता.प्रमुख अविनाश रेशमे, राष्ट्रवादीचे ता.अध्यक्ष सुधीर मसलगे, तालुकाध्यक्ष विजय पाटील, मा.सभापती अजित माने, मा.सेल. उपाध्यक्ष लक्ष्मण कांबळे, काँग्रेसचे प्रा.दयानंद चोपणे उजेडचे दिलीप ढोबळे, अ‍ॅड.नारायण सोमवंशी, पंकज शेळके, शहराध्यक्ष मुजीब सौदागर, प्रदेश काँग्रेसचे ओबीसी संघटक अजित निंबाळकर, व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष अंबादास जाधव इत्यादी भावना व्यक्त केल्या. यावेळी प्रमुख उपस्थितीत डॉ.सेलचे जिल्हाध्यक्ष अरविंद भातम्बरे, तालुकाध्यक्ष विजय पाटील, शी.अनंतपाळ तालुकाध्यक्ष आबासाहेब पाटील, मा.नगराध्यक्ष हमीद शेख, शहराध्यक्ष अजित नाईकवाडे, निलंगा वि.युवक अध्यक्ष अमोल सोनकांबळे, राष्ट्रवादीचे इस्माईल लदाफ, मा.नगरसेवक सिराज देशमुख, जिल्हाउपाध्यक्ष सुधाकर पाटील, किसान सेलचे संजय बिराजदार, निवृत्त अधिकारी व्यंकटराव शिंदे, युवा सेने तालुका प्रमुख प्रशांत वांजर वाडे, चक्रधर शेळके, सुभाष पाटील, दिनकर दाजी बिराजदार, छावाचे दास साळुंके, ईफरोज शेख,बालाजी गोमासाळे, गंगाधर चव्हाण, विठ्ठल पाटील, लिंबराज जाधव, सतीश कोणिरे, युवक तालुकाध्यक्ष मदन बिरादार, माधवराव पाटील, विक्रम जाधव, ज्ञानेश्वर पिंड,परमेश्वर सुर्यवंशी यांच्यासह महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी, विविध फ्रंटल सेलचे पदाधिकारी, सेवा दल, युवक पदाधिकारी व कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

# मंद्रूपच्या जाधव गुरुजीसह सहा जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

ठेवीदारांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी गणेश फायनान्स व संत सेवालाल निधी बँकेचे शिवाजी जाधव गुरुजी यांच्यासह सहा जणांच्या विरोधात मंद्रूप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी शीलवंत राऊतराव यांनी मंद्रूप पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मंद्रूप पोलीस ठाण्यात संत सेवालाल निधी बँक व गणेश फायनान्सचे मालक माजी मुख्याध्यापक शिवाजी जाधव यांची पत्नी सुनीता, मुलगा सचिन, सून पूजा, जावई सचिन चव्हाण व पत्नी सुजाता चव्हाण या सहाजणांविरुद्ध मंद्रूप पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी शीलवंत राऊतराव यांच्यासह ४५ जणांची २ कोटी १२ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जाधव गुरुजी व त्यांच्या साथीदारांनी या ठेवीदारांकडून बँक व फायनान्स साठी जादा परताव्याचे अमिष दाखवून ठेव घेतले. त्यानंतर मुदत झाल्यावर ठेव व व्याजाची मागणी केल्यावर ती देण्यास टाळाटाळ केली. याबाबत यापूर्वी सोलापुरातील सदर बाजार पोलीस ठाण्यात जाधव गुरुजी व बँकेच्या संचालकाविरुद्ध गुन्हा दाखल आहे. या प्रकरणात जाधव गुरुजी व त्यांचा मुलगा सचिन यांना अटक झाली असून ते न्यायालयीन कोठडीत आहेत.

# ‘डीजे मुक्त’ गणेशोत्सव साजरा करा -पोनि महेश स्वामी



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील जेऊर येथे अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली आगामी गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद सणाच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था राहिले पाहिजे. शांतता राहिले पाहिजे म्हणून जेऊर ग्रामपंचायत कार्यालयात बैठक संपन्न झाली. यावेळी जेऊरचे पोलीस पाटील रहिमान अत्तार, ब्यागेहळीचे कल्याणी गायकवाड, हंजगीचे मोहन वाघमारे, दोड्याळचे शैलेंद्र नडगम, जेऊरवाडीचे विजय चव्हाण व आजूबाजूचे जेऊर, जेऊरवाडी, दोड्याळ, हंजगी, ब्यागेहळी या गावातील सर्व गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष पदाधिकारी कार्यकर्ते ईद-ए-मिलादचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वप्रथम डीजे मुक्त गणेश विसर्जन करण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांनी सूचना दिले. तसेच पर्यावरण पूरक गणपती विसर्जन व्हावी गणपती विसर्जनाच्या वेळेस कुठल्याही प्रकारची गालबोट लागू नये यासाठी मंडळाचे सर्व पदाधिकारी खबरदारी घ्यावी. तसेच वृक्षारोपण कार्यक्रम विविध सामाजिक उपक्रम राबवून गणेशोत्सव आनंदात साजरा कराव्यात अशा सूचना दिले. तसेच विद्युत कनेक्शन रितसर परवाना घेऊन कनेक्शन घेण्यात याव्यात तसेच ग्रामपंचायत ना हरकत दाखला घ्याव्यात तसेच मालकी जागा असेल, तर त्या मालकाची परवानगी घ्यावी अशा विविध सूचना महेश स्वामी यांनी दिले. तसेच जेऊरचे उपसरपंच काशिनाथ पाटील यांनी सुद्धा प्रत्येक गणेश उत्सव मंडळ डीजे न लावता प्रत्येक उत्सवाच्या मंडळाच्या वतीने पाच पाच हजार वर्गणी गोळा करून एखाद्या गरीब कुटुंबाला घर बांधून देण्याचे आश्वासन दिले. तसेच बीट हवालदार सिद्धाराम घंटे, राऊत, मियावाले, जेऊर गावातील प्रतिष्ठित नागरिक व शेतकरी, युवा वर्ग ही मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचलन पोलीस पाटील रहिमान अत्तार तर आभार उपसरपंच कशिराया पाटील मानले.

# महापालिकेच्या प्रभाग समिती ‘ई’ ची अर्धवट कारवाई; बिल्डरला पाठीशी घालण्याचे कारस्थान



**नालासोपारा/प्रतिनिधी**

वसई विरार शहर महानगरपालिके मध्ये असलेल्या प्रभाग समिती-ई अंतर्गत येणाऱ्या नालासोपारा पश्चिम येथील लक्ष्मी बेन छेडा मार्गवरील जेमिनी बिल्डींगच्या बाजूला असलेले लोढा पार्क येथील सार्वजनिक गार्डन वर शिवानी इंटरप्रायजेसचे बिल्डर हेमंत कर्णीक यांनी अनधिकृत बांधकाम केले होते. सदर बांधकाम तोडून टाकण्यासाठी अखिल भारतीय जिवा सेनेच्या वतीने स्वातंत्र्य दिनी १५ ऑगस्ट २०२४ रोजी लाक्षणीक उपोषणाचा इशारा पालिका प्रशासनाला दिला होता. बिल्डरने सार्वजनिक गार्डनवर जे बांधकाम केले होते त्यावर महानगरपालीकने अर्धवट तोडक कारवाई केली. महानगरपालीने संपूर्ण अनधिकृत बांधकाम तोडून टाकावे व बिल्डर्सवर एम. आर.टी. पी अंतर्गत कारवाई करावी अन्यथा अखिल भारतीय जिवा सेनेच्या वतीने पुन्हा लाक्षणीक उपोषण करण्याचा इशारा गोविंद पिंपळगांवकर यांनी दिला आहे.

# वसई-विरार महापालिकेच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या

**विरार/प्रतिनिधी**

वसई-विरार महापालिकेचे प्रशासकीय कार्यालय पूर्वेकडून पश्चिमेकडे आल्यानंतर महिन्याभरातच प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. महापालिकेच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या या प्रभाग निहाय होत असतात. यामध्ये बऱ्याचदा तेच ते अधिकारी त्यांच्या अंतर्गत बदल्यांमुळे चर्चेत येत असतात. यातील काही अधिकारी वादग्रस्त असतात. हे वेगळे सांगायला नको. पालिकेच्या सात प्रभाग समित्या असून या प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांची नेहमी बदली होत असते. प्रशासकीय कामाचा समतोल सांभाळण्यासाठी बऱ्याचदा आयुक्तांना या बदल्या गरजेच्या असतात. यावेळेला एकूण २० अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. प्रभाग समिती ई मध्ये संतोष पाटील यांची बदली झाली आहे. तर नवघर माणिकपूर विभागीय कार्यालयात मेघा वर्तक प्रभाग समिती एच, तर मोहन संख्ये यांची (प्रभाग समिती डी आचोळे) येथे बदली झाली आहे. निता कोरे (प्रभाग समिती जी वालीव), निलाक्षी पाटील (प्रभाग समिती ब विरार पूर्व), शशिकांत पाटील (प्रभाग समिती अ बोळींज), गिल्सन घोन्सालवीस (प्रभाग समिती एफ-पेल्हार), व्हिक्टर डिसोजा (प्रभाग समिती सी-चंदनसार) यांच्या बदल्या झाल्या आहेत. मनाली शिंदे यांच्या बदली आदेशात बदल करुन त्यांची मुख्यालयात बदली करण्यात आली आहे.



09 TO 15 SEPTEMBER 2024 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 9/6/2024 5:22 PM Page 1



# युती-आघाडी आतापासूनच खेचाखेची सुरू

यंदाची विधानसभा निवडणूक महाराष्ट्रासाठी खूपच महत्त्वाची ठरणार आहे. याचे कारण शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये फूट पडल्यानंतर जे नवे गट तयार झाले आहेत त्यांची महाराष्ट्रात नेमकी काय स्थिती आहे याचा अंदाज आगामी विधानसभा निवडणुकीत मध्ये येणार आहे. तसा लोकसभेच्या निवडणुकीला थोडासा ट्रेलर बघायला मिळाला. परंतु त्यानंतर आपल्या पक्षांचे अस्तित्व राखण्यासाठी आणि मुख्य म्हणजे सत्तेमध्ये कायम टिकून राहण्यासाठी, महायुती मधील अजित पवार गट, शिंदे गट आणि भाजपा यांनी प्रयत्नांची पराकाष्टा चालवली आहे. भाजपाकडून राष्ट्रवादी आणि शिवसेना फोडण्याचा जो प्रकार घडला तो महाराष्ट्रातील जनतेला आवडलेला नाही. लोकसभेच्या निवडणुकीतून जनतेने हेच दाखवून दिलेले आहे. म्हणूनच तसा प्रकार विधानसभेला सुद्धा घडू नये म्हणून लाडकी बहीण सारख्या योजना आणल्या. जेणेकरून संपूर्ण महिला वर्गाचा महायुतीला पाठिंबा मिळावा. परंतु तसे होणार नाही. कारण महिलांनाही कळून चुकलेले आहे की महायुतीतले फुटीर कोणत्या थराला जाऊ शकतात. त्यामुळे जनहिताच्या नावाखाली अशा योजनांद्वारे लोकांना लालच दाखवून आपली सत्ता राखता येईल, हा महायुतीचा गैरसमज आहे. त्यामुळेच आपले जुने तंत्र वापरायला त्यांनी सुरुवात केली आहे. आणि ते जुने तंत्र म्हणजेच फोडाफोडी! अर्थात फोडाफोडीचे हे राजकारण केवळ महायुतीच्या नेत्यांकडून सुरू आहे असे नाही. तर महाविकास आघाडीचे नेते महायुती पेक्षाही दोन पावले पुढे गेलेले आहेत. फोडाफोडीचा दांडगा अनुभव असलेले शरद पवार यांनी आत्तापर्यंत महायुतीतील काही बड्या नेत्यांना आपल्याकडे वळवलेले आहे. यामध्ये कोल्हापुरातील भाजपाचे नेते समर्जित सिंग घाडगे यांचा समावेश आहे. गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादीतून फुटून गेलेले बरेचसे लोक शरद पवारांच्या उंबरठ्याची पायधूळ झाडत आहेत. त्यामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला एक प्रकारे विधानसभा निवडणुकीपूर्वी बळ मिळत आहे. तर भाजपाने सुद्धा राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या काही लोकांवर जाळे टाकलेले आहे आणि आज ना उद्या तेही भाजपात जाऊ शकतात. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावरच सुरू असलेली ही खेचाखेची महाराष्ट्राच्या राजकारणाला आणखी कलंकित करणारी आहे. कारण जे दलबदलू असतात ते केवळ त्यांच्या पक्षाचाच नव्हे, तर मतदारांचाही विश्वासघात करीत असतात. त्यामुळे अशा लोकांना मतदार कितपत साथ देतील हे सांगता येत नाही. शिवसेना आणि राष्ट्रवादीतून जे लोक फुटले होते त्यांचे अवस्था खूप वाईट आहे. भाजपाने त्यांच्या युज अँड थ्रो या धोरणानुसार लोकसभा निवडणुकीसाठी फुटिरांचा वापर करून घेण्याचा प्रयत्न केला. पण त्यात अपयश आल्यामुळे आता या फुटीरांचे त्यांना ओझे वाटू लागले आहे. इंदापूर मतदार संघावर माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे निर्विवाद वर्चस्व होते आणि आजही आहे. परंतु वर्षवर्धन पाटील यांनी काँग्रेस सोडण्याची मोठी चूक केली आणि भाजपात प्रवेश केला. पण त्यांना काय मिळाले हा खरोखरच संशोधनाचा विषय आहे. आणि आता तर त्यांच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला आहे. कारण महायुतीमध्ये ही जागा अजित दादांच्या राष्ट्रवादीकडे जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे हर्षवर्धन कमालीच्या अस्वस्थ झालेले आहेत. लोकसभा निवडणुकीतच त्यांनी महायुतीच्या बड्या नेत्यांबरोबर विधानसभेसाठी इंदापूरचा सौदा केला होता. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत इंदापूर मतदार संघ आपल्याला मिळायला हवा असा हर्षवर्धन पाटलांचा आग्रह आहे. परंतु तसे होणे कठीण दिसते. त्यामुळे हर्षवर्धन पाटील ही शरद पवारांच्या संपर्कात आहेत. त्याचबरोबर लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांनी पद्धत शिरपने माढा मतदार संघात फिल्डिंग लावून मोहिते पाटील गटाच्या दिग्गजाला फोडले. आणि त्याला निवडून ही आणले. भाजपासाठी हा फार मोठा धक्का होता. तोच प्रकार सांगलीमध्ये घडला आहे. सांगलीमध्ये संजय पाटील सारख्या भाजपाच्या मातब्बर उमेदवाराला अपक्ष विशाल पाटील यांनी पराभूत केले. विशाल पाटील हे जरी अपक्ष असले तरी ते काँग्रेसमधीलच असल्यामुळे ते काँग्रेस सोबतच राहणार आहेत. आज विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शिवसेना राष्ट्रवादीतून फुटून गेलेले असे कितीतरी नेते शरद पवार आणि महाविकास आघाडीच्या संपर्कात आहेत. तर मविआतील काही नेते भाजपाच्या संपर्कात आहेत. विधानसभा निवडणुकीच्या काही दिवस अगोदर हे सर्व फुटीर उंदरांसारखे इकडून तिकडे पळू लागतील. पण यांच्यावर भरोसा ठेवणाऱ्या त्यांच्या मतदारसंघातील नागरिकांचा काय दोष आहे? असे फुटीर आणि दलबदलू सर्वसामान्य माणसांचे लोकप्रतिनिधी कसे काय बनू शकतात? हा सवाल मतदारांचा आहे. म्हणूनच यावेळी मतदार जागृत झालेले आहेत आणि काही झालं तरी या फुटीरांना अद्दल घडवायची असा निर्धार मतदाराने केलेला आहे. लोकसभा निवडणुकीत त्याची झलक बघायला मिळाली. ४५ प्लसचा दावा करणारे भाजपवाले वीस जागाही मिळू शकले नाहीत. या उलट महाविकास आघाडीने मोठी झेप घेतली. त्याच निकालाची पुनरावृत्ती विधानसभा निवडणुकीत होण्याची शक्यता आहे. आणि म्हणूनच लाडकी बहीण योजनेसारख्या अत्यंत खर्चिक आणि महाराष्ट्राला न परवडणाऱ्या योजना जबरदस्तीने राबवल्या जात आहेत. लाडकी बहीण योजनेसाठी दर महिन्याला सरकारला ४५ हजार कोटींची तरतूद करावी लागते. पण महाराष्ट्रावर साडेसात लाख कोटींचा कर्जाच बोजा असताना हे शक्य नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीपर्यंत लाडक्या बहीण योजनेचे पैसे आमच्या माता भगिनींना मिळतील. त्यानंतर मात्र ही योजना पुढे सुरूच राहील की नाही याची गॅरंटी देता येत नाही. काँग्रेसने ही योजना पुढे सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले आहे. इतकेच नव्हे तर महायुतीच्या सरकारने तुम्हाला १५00 दिले होते आम्ही २000 देऊ अशी घोषणा काँग्रेस अध्यक्ष खर्गे यांनी जाहीर सभेत केली. लोकांच्या पैशाची अशा प्रकारे उधळपट्टी करण्याचा कोणालाही अधिकार नाही. परंतु कुठल्याही राजकीय पक्षाने चांगली कामे केलेली नाहीत, लोकांचा विश्वास टिकवलेला नाही. स्वतःच्या फायद्यासाठी इकडून तिकडे उड्या मारण्याची त्यांना घाणेरडी सवय आहे. या सगळ्या गोष्टीमुळे मतदारांचा राजकीय पक्षांवरचा विश्वास उडालेला आहे. आणि म्हणूनच आता ज्यान पक्षात तिकीट मिळण्याची शाश्वती नाही, असे लोक दुसऱ्या पक्षाची दारे ठोठावत आहेत. ही खरंतर त्यांच्या राजकीय जीवनाची शोकांतिका आहे. पण असे लोक कधीही विश्वासनीय ठरू शकत नाहीत. जे त्यांच्या स्वतःच्या पक्षाची गद्दारी करतात, ते भविष्यात ज्या पक्षात जातील त्यांच्याशी गद्दारी करणार नाहीत कशावरून? त्यामुळे विधानसभा निवडणुकीसाठी खेचाखेची सुरू झालेली आहे. त्यातून दलबदलूंचे काहीही भले होणार नाही. आज परिस्थिती अशी आहे की ज्या लोकांनी भाजपवर विश्वास टाकून शिवसेना राष्ट्रवादीतून भाजपा सोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्या लोकांना विधानसभा निवडणूक तिकीट मिळेल की नाही याची काहीही गॅरेंटी नाही. कारण भाजपाने २०० पेक्षा अधिक जागांवर दावा केला आहे. त्याचबरोबर महायुतीत असलेले पक्ष एकमेकांच्या मतदारसंघांवर आतापासूनच दावा करीत आहेत. त्यामुळे खेचाखेचीचे हे राजकारण आणखी वाढणार आहे. ज्याला महायुतीत तिकीट मिळण्याची शाश्वती वाटत नाही ते महाविकास आघाडीकडे जाणार आहेत. तर ज्यांना महाविकास आघाडीमध्ये तिकीट मिळण्याची आशा नाही ते महायुतीत जाणार आहेत. या अशा प्रकारच्या लोकांमुळेच लोकशाहीचे वाटोळे झालेले आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकी मतदारांनी या फुटीरांना, या दलबदलूना धडा शिकवणे गरजेचे आहे. तरच या देशातील लोकशाही वाचू शकेल.

### राष्ट्रपतीच्या उपस्थितीत सिम्बॉयसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचा पदवीदान समारंभ संपन्न

# देशातील सर्व समुदायाच्या गरजा जाणून त्यांच्यासाठी विविध सॉफ्टवेअर, उत्पादने व धोरण बनवावीत -राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू



**पुणे/प्रतिनिधी**

देशातील विविध समुदाय, प्रदेशांची संस्कृती आणि त्यांच्या आजच्या गरजा समजून घेत देशातील प्रत्येकाच्या विशेषतः दुर्लक्षित घटकाच्या विकासाला सहाय्यकारी होऊ शकतील अशी सॉफ्टवेअर, आरोग्यसेवा उत्पादने आणि बाजारपेठीय धोरणे बनवावीत, असा संदेश राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विद्यार्थ्यांना दिला. विविध सिम्बॉयसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठ लवळे येथे आयोजित २१ व्या पदवीप्रदान समारंभात राष्ट्रपती बोलत होत्या. यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विद्यापीठाचे कुलपती डॉ. शां. ब. मुजूमदार, कुलगुरु डॉ. रामकृष्णन रमण, प्र. कुलगुरु विद्या येरवडेकर आदी उपस्थित होते. पदवीप्रदान सोहळ्यात पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन राष्ट्रपती श्रीमती मुर्मू म्हणाल्या, आज मुले आणि मुली प्रत्येक क्षेत्रात प्रगती करत आहेत. नारी शक्तीचा विकास हा देशवासियांसाठी अभिमानाचा विषय आहे, शिवाय देशाच्या विकासाचाही तो एक महत्त्वाचा मापदंड आहे. सिम्बॉयसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठात लिंग समानतेला प्राधान्य दिले जाते ही बाब प्रशंसनीय आहे. पदवीदान सोहळ्यात सुवर्णपदक प्राप्त ११ विद्यार्थ्यांपैकी ८ विद्यार्थिनी असल्याबाबत शिक्षणासाठी येथे योग्य वातावरण आणि सुविधा दिल्या जातात, असे दिसून येते. मुलींना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करण्यासह त्यांच्यासाठी सुरक्षित आणि आश्वासक वातावरण निर्माण करण्यासाठी कार्यक्रम राबवण्याचे आवाहन राष्ट्रपतींनी शैक्षणिक संस्थांना केले.

जगातील अनेक भागातून या संस्थेत उच्च शिक्षणासाठी विद्यार्थी येतात. भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी देश-विदेशात आणि विविध क्षेत्रात प्रभावी योगदान देण्यासाठी एक सशक्त संपर्क जाळे (नेटवर्क) देखील बनवतात. भविष्यात विदेशातील विद्यार्थी आपल्या देशात गेल्यावरही या संस्थेशी नाते कायम ठेवतील तसेच आपल्या आधुनिक ज्ञान आणि कौशल्यांचा उपयोग मानवतेच्या कल्याणासाठी करतील, असा विश्वासही राष्ट्रपतींनी यावेळी व्यक्त केला. श्रीमती मुर्मू पुढे म्हणाल्या, विद्यार्थी आपल्या व्यक्तिमत्वाने आणि ज्ञानाने देश-विदेशातील मोठ्या संस्था आणि इतर लोकांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणू शकतात. नवकल्पना आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगद्वारे व्यवस्थापन, आरोग्यसेवा, विधी, सामाजिक विज्ञान आणि अन्य क्षेत्रात प्रभावी योगदान देऊ शकता. मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया, स्किल इंडिया, डिजिटल इंडिया याद्वारे ध्येये साध्य करण्यासाठी मदत होईल. केवळ आपल्या उपजीविकेचा आणि कुटुंबाचा विचार न करता वसुधैव कुटुंबकम' या अर्थाने संपूर्ण जगाचा विचार करावा, असा संदेश राष्ट्रपतींनी विद्यार्थ्यांना दिला. राष्ट्रपती पुढे म्हणाल्या, शिक्षण व्यवस्थेत संशोधनाला चालना देण्याची आवश्यकता आहे. अनेक वर्षांच्या संशोधनामुळे नवीन शोध आणि आव्हानांना तोंड देण्यासाठी नवीन उपाय शोधले जात आहेत. संशोधक विद्यार्थी केवळ देशाच्याच नव्हे तर जगाच्या समस्यांवर उपाय शोधू शकतात. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातही संशोधनावर भर देण्यात आला असून बहु- शाखीय अभ्यासक्रम आणि समग्र शिक्षणालाही चालना दिली जात आहे.

**विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग रोजगार निर्मितीसाठी करावा- राज्यपाल**

देश विदेशातील विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग रोजगार निर्मितीसाठी करावा. गरिबी, वंचितता, युद्ध, अस्थिरता आणि अन्य कारणांमुळे समाजाच्या परिघाबाहेर जगणाऱ्या लोकांचाही विचार करावा, असे आवाहन श्री. राधाकृष्णन यांनी यावेळी केले. बदलत्या काळानुसार कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंगसारखे क्षेत्र उदयास येत असून यामुळे अनेक नोकऱ्या कालबाह्य ठरतील. तथापि, कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे नवीन रोजगारही निर्माण होणार असून या क्षेत्राचे ज्ञान घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निश्चितच नवीन संधींचा लाभ होणार आहे.

सिम्बॉयसिस जगभरातील विद्यार्थ्यांना आणि विशेषतः अफगाणिस्तानसह अन्य देशांतील मुलींसाठी ऑनलाइन पदवी अभ्यासक्रम राबविते, हे अत्यंत कौतुकास्पद आहे. सिम्बॉयसिसने जगातील विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्ट शैक्षणिक वर्ग चालवावेत असे सांगून ज्ञानाचा प्रकाश जगाच्या कानाकोपऱ्यात पसरवला पाहिजे, असेही राज्यपाल यावेळी म्हणाले. डॉ. मुजूमदार म्हणाले, देशात एक हजारावर विद्यापीठे असून यापैकी सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठ एक आहे. या विद्यापीठात शिक्षण, संशोधन, व्यवसाय, आदी बाबींसह विशेषत: मूल्य शिक्षण देण्यावर भर देण्यात येतो. वसुंधैव कुटुंबकम' संकल्पनेवर काम करुन जागतिक पातळीवर ज्ञानदानाचे काम करण्यात येत आहे. भारताचे नाव विदेशात पोहचविण्याचे काम करीत आहे.

यावेळी कुलगुरू डॉ. रमण यांनी विद्यापीठ वार्षिक अहवालाचे वाचन केले, विद्यापीठाच्या विविध परिसरात भारतातील विविध राज्यातील विद्यार्थ्यांसह जगभरातील ८५ देशातील विद्यार्थी शिकत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांच्या हस्ते उत्कृष्ट परदेशी विद्यार्थ्यांचा पुरस्कार नायजेरीया देशाचा डिलाईट पीटर्स या विद्यार्थ्याला देण्यात आला. तसेच १२ विद्यार्थ्यांना सुवर्णपदके प्रदान करण्यात आली. तसेच विद्यापीठात शिकणाऱ्या ३५ देशाच्या विद्यार्थी प्रतिनिधींनी आपल्या देशाचे राष्ट्रीय ध्वज राष्ट्रपती यांच्याकडे प्रदान करून एकत्रित केले. डॉ. येरवडेकर यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. यावेळी विविध विद्या शाखेचे अधिष्ठाता, प्राचार्य आदी यावेळी उपस्थित होते.

# पिडीत महिला आणि बालकांच्या संरक्षणार्थ नव्या कायद्यांचे पाठबळ!

**मुंबई/प्रतिनिधी**

महिला व बालकांच्या संरक्षणासाठी शासनाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. अत्याचारग्रस्त पीडित महिलांच्या संरक्षणासाठी गुन्हेगारांवर कायद्याचा धाक' राहणे आवश्यक आहे. केंद्र शासनाने १ जुलै २०२४ पासून नवीन कायदे अंमलात आणले आहेत. या कायद्यांतील विविध कलमांन्वये महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये कडक शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे महिला व बालकांचे संरक्षण करण्यासाठी कायद्याचे पाठबळ मिळणार आहे. केंद्र शासनाने भारतीय दंड संहिता १८६०, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ आणि भारतीय पुरावा कायदा १९७२ या कायद्यांऐवजी भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय पुरावा कायदा २०२३ व भारतीय नागरी संरक्षण संहिता कायदा २०२३ अंमलात आणला आहे. या सर्व नवीन कायद्यांची १ जुलै २०२४ पासून अंमलबजावणी सुरू झाली आहे. भारतीय न्याय संहितेमध्ये कलम ६९ अन्वये महिलांवरील अत्याचाराबाबत आणखी एक नवीन कलम समाविष्ट केले आहे. एखाद्या व्यक्तीने लग्न, नोकरी किंवा बढतीचे खोटे आश्वासन देऊन एखाद्या महिलेशी लैंगिक संबंध ठेवल्याच्या गुन्ह्यांना नवीन कायद्यात स्थान मिळाले आहे. कामाच्या ठिकाणी पदोन्नतीच्या बदल्यात महिलांकडे लैंगिक सुखाची मागणी करण्यात येत असल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत. त्यामुळे या नवीन कलममुळे अशा पीडित महिलांना जलद न्याय मिळण्यास मदत होणार आहे. कामाच्या ठिकाणी महिलांविषयीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी या गुन्ह्यातील शिक्षेमध्ये दहा वर्षांपर्यंत कारावास आणि दंडदेखील होऊ शकतो. तसेच कलम ७० (२) अन्वये अल्पवयीन १८ वर्षाखालील मुलीवर सामूहिक बलात्कार झाल्यास गुन्ह्यातील प्रत्येक व्यक्तीने तो गुन्हा केल्याचे समजले जाईल. या गुन्ह्यांमध्ये जन्मठेपेची शिक्षा होती, ती आता फाशीच्या शिक्षेत रूपांतरीत करण्यात आली आहे. तसेच कलम ७६ अन्वये एखाद्या महिलेस निर्वस्त्र करण्याच्या हेतून हल्ला करणे, किंवा अशा कृत्याला प्रवृत्त करतो, अशाविरूद्ध किमान ३ वर्ष शिक्षा ठोठावण्यात येवून ही शिक्षा दंडासह ७ वर्षांपर्यत वाढविण्यात येवू शकते. कलम ७७ अन्वये जर एखाद्या व्यक्तीने एखाद्या महिलेचे खासगी संभाषण ऐकले, तिचे खाजगी कृत्य पाहीले किंवा तिचे कपडे बदलताना पाहिले किंवा तिचे फोटो काढले व कोणी प्रसारित केले तर त्याला प्रथम दोषी ठरल्यावर कमीतकमी एक वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा होईल, परंतु जी तीन वर्षांपर्यत वाढू शकते आणि दंडही होऊ शकतो. तसेच दुसऱ्यांदा दोषी आढळल्यास किमान तीन वर्ष शिक्षा जी सात वर्षांपर्यतच्या कालावधीसाठी वाढविण्यात येऊ शकते. यामध्ये दंडही होऊ शकतो. बालकांवरील गुन्ह्यांमध्ये कलम ९५ अन्वये गुन्हा करण्यासाठी एखाद्या मुलाला कामावर ठेवणे, त्याला गुन्हा करण्यासाठी गुंतविणे ही बाब समाविष्ट करण्यात आली आहे.अशा गुन्ह्यामध्ये दंडासह किमान तीन वर्ष कारावासाची शिक्षा होईल, ती १० वर्षांपर्यत दंडासह वाढविली जावू शकते. अशा प्रकरणात गुन्हा घडल्यास हा गुन्हा स्वत: मुलाला कामावर ठेवणाऱ्या व्यक्तीने केला आहे, असे समजण्यात येणार आहे. तसेच कलम ९९ अन्वये जो कोणी कोणत्याही वयात एखाद्या मुलाला वेश्या व्यवसायाठी किंवा कोणत्याही व्यक्तीशी बेकायदेशीर लैंगिक संबंध ठेवण्याच्या हेतूने, कोणत्याही बेकायदेशीर आणि अनैतिक हेतुसाठी अशा मुलाचा ताबा घेतो, कामावर ठेवतो किंवा कोणत्याही बेकायदेशीर कारणासाठी त्याचा उपयोग करतो. अशा गुन्ह्यासाठी कारावासाची दंडासह किमान सात वर्षांपर्यत शिक्षा असून ही शिक्षा १४ वर्षांपर्यत वाढविण्यात येवू शकते. अशाप्रकारे नवीन कायद्यांमध्ये महिला व बालकांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये नवीन कलम, आधीच्या कलमांमधील तरतूदीमध्ये बदल करून महिलांची सुरक्षीतता भक्कम करण्यात आली आहे.

# अमृत-इंडो जर्मन टूल रुम 'छत्रपती संभाजीनगर' या संस्थांमध्ये सामंजस्य करार

## रुपये ७० हजार पर्यन्तचे मोफत अभ्यासक्रम उपलब्ध; २० सप्टेंबर २०२४ पर्यन्त अर्ज करावे!

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकतील ज्या जातीना कोणत्याही शासकीय विभाग संस्था महामंडळ याच्या योजनेचा लाभ मिळत नाही. अश्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील १८ ते ४० वयोगटातील पात्रताधारक युवक युवतींसाठी इंडो जर्मन टूल रूम (आय.जी.टी.आर.) ने महाराष्ट्र सशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे या संस्थेसोबत केलेल्या सामंजस्य करारानुसार अमृत संस्थेकडून इंडो जर्मन टूल रूम (छत्रपती संभाजीनगर) च्या माध्यमातून प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना सहाय्य केले जाणार आहे. इच्छुक पात्रता धारक उमेदवारानी दिनांक २० सप्टेंबर २०२४ पर्यन्त अमृतच्या www.mahaamrut.org.in या संकेतस्थळावर अर्ज करावे. अशी माहिती अमृत, पुणेच्या निबंधक डॉ. प्रिया देशपांडे यांनी दिली आहे. इंडो जर्मन टूल रूम (छत्रपती संभाजीनगर) या लघु सूक्ष्म आणि मध्यम उद्द्योग मंत्रालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या भारत सरकारच्या नावाजलेल्या प्रशिक्षण संस्थेत उद्द्योगासाठी आवश्यक असलेले तात्रिक प्रशिक्षण देण्यात येते. या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत अमृत संस्थेच्या लक्षित गटातील उमेदवारांना उत्कृष्ट दर्जाचे निवासी तसेच अनिवासी प्रशिक्षण देण्यात येणार असून, या प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च (प्रशिक्षण, राहणे व जेवण) अमृत, पुणे या सस्थेमार्फत करण्यात येणार. राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकतील ज्या जातींना कोणत्याही शासकीय विभाग संस्था महामंडळ यांच्या योजनेचा लाभ मिळत नाही. अश्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील १८ ते ४० वयोगटातील पात्रताधारक युवक युवती या योजनेचा लाभ घेऊ शकतात. या योजनेअंतर्गत १५ निवासी प्रशिक्षण अभ्यासक्रम तसेच ३० अनिवासी प्रशिक्षण अभ्यासक्रम हे आय.जी.टी.आर. (छत्रपती संभाजीनगर) संस्थेच्या छत्रपती सभाजीनगर, वाळूज, पुणे, नागपूर, कोल्हापूर, अश्या उपकेंद्रात दिले जाईल. १० वी पास तसेच आय.टी.आय /पदविका/पदवी उत्तीर्ण किंवा अंतिम वर्षात शिकत असलेले उमेदवार या योजनेसाठी अर्ज करू शकतात. इच्छूक उमेदवारांचा महाराष्ट्र राज्यात अधिवास असणे अनिवार्य आहे. याबाबत सविस्तर माहिती www.mahaamrut.org.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. उद्योगाभिमुख रोजगाराच्या आणि स्वयरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन स्वावलंबनाला चालना देणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. अमृतच्या लक्षित गटातील युवक युवतींनी या योजनेचा जास्तीतजास्त लाभ घ्यावा, असे आवाहन अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण**, सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे**, कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे**. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# कळवा रुग्णालयाबाहेरच महिलेची प्रसूती; एक बाळ दगावले, दुसरे सुखरुप, कुटुंबीयांचा निष्काळजीचा आरोप

**ठाणे/प्रतिनिधी**

ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाबाहेर मंगळवारी सकाळी एका महिलेची प्रसूती झाल्याचा प्रकार घडला. या घटनेत एका नवजात बालकाचा मृत्यू झाला. पोटात दुखू लागल्याने ही गर्भवती महिला रुग्णालयात पहाटे चारच्यादरम्यान आली होती. मात्र तिला रुग्णालयात दाखल करून न घेता घरी पाठवण्यात आले. घरी गेल्यावर पुन्हा पोटात दुखू लागल्याने रुग्णालयात आल्यानंतर येथील आवारात गाडीमध्ये महिलेची प्रसूती झाली. यावेळी एका बालकाचा रुग्णालयाबाहेरच प्रसूतीदरम्यान मृत्यू झाला. तर दुसऱ्या बालकाची प्रसूती रुग्णालयात करण्यात आली. ते नवजात अर्भक सुखरूप असून रुग्णालय प्रशासनाच्या निष्काळजीमुळेच आमच्या एका बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोप महिलेच्या कुटुंबीयांनी केला आहे.




कळवा पूर्व येथील ओतकोनेश्वर नगर भागात राहणाऱ्या महिलेचे प्रसूतीसाठी कळवा रुग्णालयात नोंदवले होते. याच रुग्णालयात तिच्या नियमित तपासण्या सुरू होत्या. मंगळवारी पहाटे चारच्या सुमारास पोटात दुखू लागल्याने ती रुग्णालयात आली. मात्र तिला रुग्णालयात दाखल करून न घेता पुन्हा घरी पाठवण्यात आले. प्रसूतीची वेळ अद्याप आली नसल्याचे सांगत तिला घरी पाठवण्यात आल्याचे नातेवाईकांनी सांगितले. मात्र घरी गेल्यावर या महिलेला पोटात पुन्हा दुखू लागल्याने सकाळी तिला खासगी वाहनाने नातेवाईकांनी पुन्हा रुग्णालयात आणले. वाटेत वाहतूककोंडी असल्याने रुग्णालयात पोहचण्यास उशीर झाला. त्यामुळे रुग्णालयाच्या बाहेरच तिची प्रसूती झाली. गाडीतच तिने एका मुलाला जन्म दिला. त्यानंतर या महिलेला तातडीने रुग्णालयाच्या प्रसूती कक्षात नेण्यात आले. याठिकाणी तिने दुसऱ्या मुलाला जन्म दिला. मात्र गाडीत प्रसूती झालेल्या अर्भकाला डॉक्टरांनी मृत घोषित केले. तर दुसरे बालक व्यवस्थित असल्याची माहिती रुग्णालय व्यवस्थापनाने दिली. संबंधित महिला ही आठ महिन्याची गर्भवती होती. त्यामुळे तिची प्रसूतीची वेळ आली नव्हती. ती सकाळी नऊच्या सुमारास येथे आली, तेव्हा तिची रुग्णालयाच्याबाहेरच प्रसूती झाली. रुग्णालयाच्या वतीने तातडीने या महिलेला शस्त्रक्रिया विभागात नेऊन तिच्यावर उपचार सुरु केले. यामध्ये एका बालकाचे वजन १.४ किलो असल्याने ते फार अशक्त होते. त्यामुळे त्याचा मृत्यू झाला. दुसऱ्या बालकाचे वजन दोन किलोपेक्षा जास्त असल्याने हे बाळ सुखरूप आहे, असे कळवा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अनिरुद्ध माळगावकर यांनी सांगितले.

# आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेत कै. रसिका महाविद्यालयास दुहेरी मुकुट




**देवणी/प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने 'ब' झोन आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस (पुरुष आणि महिला) स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत कै. रसिका महाविद्यालयाच्या पुरुष व महिला संघाने घवघवीत यश प्राप्त केलेले आहे. त्यात पुरुषाच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला आहे .तर महिलांच्या संघाने पण द्वितीय क्रमांक पटकावलेला आहे. पुरुषांच्या संघात ताहेर बागवान, नारायण राठोड, सोमेश्वर पाशमे, गंगाधर घुगे, तर महिलांच्या संघात पाटील सरस्वती, मोरे कविता, धुळेकर वैशाली या खेळाडूंचा समावेश होता. या खेळाडूस प्रा.डॉ.सचिन चामलेयांचे मार्गदर्शन लाभले आहे. या खेळाडूंच्या यशाबद्दल संस्थाअध्यक्ष गोविंदरावजी भोपणीकर, सचिव गजाननजी भोपणीकर व सर्व संस्था पदाधिकाऱ्यांतर्फे तसेच प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे उपप्राचार्य शिवाजी सोनटक्के व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# दहीहंडीत बक्षीस जिंकलं, सेलिब्रेशननंतर काही तासांतच दोन गोविंदांचा मृत्यू



**भिवंडी/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील भिवंडी शहरात नुकत्याच पार पडलेल्या दहीहंडी उत्सवाच्या जल्लोषात सहभागी झालेल्या रामसेतू गोविंदा पथकाने मिळवलेल्या बक्षीसाच्या रकमेतून पिकनिकचा आनंद घेण्यासाठी वाशिंद येथील एका फॉर्महाऊसवर पथकातील गोविंदा गेले होते. मात्र या आनंदाच्या क्षणांचे दु:खात रूपांतर झाले, कारण परतीच्या प्रवासात दोन गोविंदांचा अपघाती मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. ही घटना मुंबई-नाशिक महामार्गावरील संग्रिला हॉटेलजवळ पहाटेच्या सुमारास घडली. गेल्या आठवड्यात भिवंडी शहरातील विविध भागांमध्ये दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला होता. रामसेतू गोविंदा पथकाने यावेळी उत्कृष्ट कामगिरी करत मोठी बक्षीस रक्कम जिंकली होती. या जिंकलेल्या रकमेतून पथकाने आपल्या मित्रांसह वाशिंद येथील शंकर टावरे यांच्या फॉर्महाऊसवर पिकनिक साजरी करण्याचे ठरवले. गोविंदा पथकातील मित्रांच्या पिकनिक प्लॅननुसार १ सप्टेंबर रोजी संध्याकाळी हे पथक भिवंडीहून वाशिंदला रवाना झाले. तिथे त्यांनी एकत्रितपणे २४ तासांपेक्षा अधिक वेळ घालवून हसत-खेळत सेलिब्रेशन केले. मात्र परतीच्या प्रवासानंतर झालेल्या अपघातात आशिष ललजीत वर्मा (१४) व खुर्शीद आलम नजीर अली (१८) या दोन गोविंदांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली.

गोविंदा पथकाचे सेलिब्रेशन संपल्यानंतर पहाटे साडेचारच्या सुमारास हे तरुण आपल्या वाहनांवरून भिवंडीला एक्टिवा स्कूटरवरून परतत असताना, अशोक नगर येथील टावरे कंपाउंडमधील आशिष लालजीत वर्मा (१४) आणि कारीवली गुप्ता कंपाउंडमधील खुर्शीद आलम नजीर अली (१८) हे दोघे आपल्या तिसऱ्या मित्रासह भिवंडीच्या दिशेने जात असताना मुंबई-नाशिक महामार्गावरील संग्रिला हॉटेलजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या एक्टिवाला जबर धडक दिली. ज्यामुळे आशिष आणि खुर्शीद यांचा जागीच मृत्यू झाला, तर तिसरा मित्र सुदैवाने याअपघातातून बचावला.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच भिवंडी तालुका पोलिस ठाण्याचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पीआय दादासाहेब एडके यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार संतोष गिरी, पीएसआय तोडासे, एससी वाठारकर, आणि एएसआय वानखेडे यांनी अपघाताचा पंचनामा केला आणि दोन्ही मृतदेह ताब्यात घेऊन इंदिरा गांधी रुग्णालयात पाठवले. पोस्टमार्टमनंतर दोन्ही मृतदेह त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले. रामसेतू गोविंदा पथकाच्या आनंदी उत्सवाचे असे दु:खद अंत झाल्याने भिवंडी शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या दुर्घटनेने संपूर्ण शहरात शोककळा पसरली आहे. पोलीस अज्ञात वाहनाचा शोध घेत असून, अपघाताची अधिक तपास भिवंडी तालुका पोलीस करीत आहेत.

# बिस्कीट बनवणाऱ्या मशीनचा बेल्ट गळ्याला लागून चिमुरड्याचा मृत्यू

**अंबरनाथ/प्रतिनिधी**

बिस्कीट बनवणाऱ्या मशीनचा बेल्ट गळ्याला लागून तीन वर्षांच्या चिमुरड्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना अंबरनाथमधून समोर आली आहे. डबे पुरवण्याचं काम करणाऱ्या आईसोबत बिस्किटाच्या कंपनीत गेला असताना हा अंगाचा थरकाप उडवणारा प्रकार घडला. धक्कादायक बाब म्हणजे मशीनच्या बेल्टवरुन जाणारे बिस्किट उचलण्यासाठी चिमुरडा नकळत धावला असताना ही घटना घडली आहे. ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ शहरातील आनंद नगर भागात असलेल्या एमआयडीसीमध्ये एका बिस्किट बनवण्याच्या कंपनीत ही घटना घडली आहे. या प्रकरणी अंबरनाथ पूर्वेकडील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करत पोलिसांनी तपास सुरू केला आहे. आयुष चौहान (वय ३ वर्ष) असे मृत चिमुरड्याचे नाव आहे. विशेष म्हणजे तो एकुलता एक मुलगा होता.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मयत आयुष हा अंबरनाथ पूर्वेतील आनंद नगर एमआयडीसी नजीक असलेल्या ठाकूर पाडा भागातील एका चाळीत आई वडिलांसह राहत होता. तो मूळचा बिहार राज्यातील असून त्याची आई पूजा कुमारी नितेश चौहान (वय २२) ही उपजीविकेसाठी बिस्कीट कंपनीतील ५ ते ६ कामगारांना जेवणाचे डबे पुरवत असे. नेहमीप्रमाणे ३ सप्टेंबर रोजी सकाळच्या सुमारास आनंद नगर एमआयडीसी भागातील चिखलोली प्लॉट क्रमांक ४०, ४१ येथील बिस्कीट बनविणाऱ्या राधे कृष्ण कंपनीत महिला मुलासोबत जेवणाचे डबे देण्यासाठी गेली होती. त्याच सुमारास आयुषला मशीनच्या ब्लेटवरून बिस्किटे एका मागून एक जात असल्याचे दिसले. चिमुकल्या आयुषला त्याचा मोह आवरला नाही. एक बिस्कीट उचलण्यासाठी वाकताच त्याच्या गळ्याला बेल्ट लागून तो गंभीर जखमी झाला. ही घटना पाहून कंपनीमधील कामगारांनी मशीन बंद करत चिमुरड्याला उल्हासनगरमधील मध्यवर्ती शासकीय रुग्णालयात दाखल केलं. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होत. या घटनेमुळे चिमुरडा राहत असलेल्या भागात हळहळ व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे तो आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. या प्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक भगत यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी सांगितले की मृत मुलाची आई कंपनीतील कामगारांना जेवणाचे डबे पुरवत असून घटनेच्या दिवशी तिच्यासोबत मुलगा आला होता. धावत्या मशीनच्या बेल्टमधून बिस्कीट उचलत असतानाच हा अपघात घडला आहे. त्याची २२ वर्षीय आई पूजा कुमारी चौहान यांच्या तक्रारीवरून अकस्मात मृत्यूची नोंद करून पोलिसांनी तपास सुरू केल्याचे सांगितले.

# विरार येथील विद्यार्थ्यांनी घेतली टेकचेज २०२४ची अनोखी सफर

**विरार/प्रतिनिधी**

विरार पूर्व येथील विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्टच्या विवा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे नवीन तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यासाठी पंधराव्या टेकचेज २०२४ 'युगांतर' या कार्यक्रमाचे आयोजन ३० व ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत करण्यात आलेले होते. विवा टेक्नॉलॉजीच्या ७ विभागांतर्गत २१ विविध नावीन्यपूर्ण इव्हेंट्स आणि तंत्रज्ञान प्रकल्पाचे प्रदर्शन घेण्यात आले. या टेकचेज साठी कै. पांडुरंग रघुनाथ पाटील उत्कर्ष कनिष्ठ महाविद्यालयातील बारावीच्या विज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली आणि बारावीनंतर अभियांत्रिकी क्षेत्रातील करिअरच्या नवनवीन संधी याबद्दल माहिती जाणून घेतली. महाविद्यालयात असणाऱ्या विविध अभियांत्रिकी शाखा यासंदर्भात उपप्राचार्या डॉ. अर्चना इंगळे ह्यांनी उत्तम मार्गदर्शन केले. विज्ञान शाखेतील ४०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी विवा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेचा परिसर आणि विविध अभियांत्रिकी शाखा या संदर्भात माहिती मिळाल्यामुळे अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रवेश आणि शाखा निवड या संदर्भात मार्गदर्शन मिळाल्याचा आनंद व्यक्त केला. विद्यार्थ्यांना ही अनोखी सफर यशस्वी होण्यासाठी समन्वयक म्हणून डॉ. चिन्मय पिंगुळकर आणि डॉ. महेंद्र घरत आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शिक्षक यांनी मार्गदर्शन केले.



# शासकीय वसतिगृहात अल्पवयीन मुलावर लैंगिक अत्याचार

रायगड : जिल्ह्यात एका शासकीय वसतिगृहात अंदाजे १४ वर्षे वयाच्या दोन मुलांनी १२ वर्षांच्या मुलावर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. वतिगृहातील एका खोलीत तीन अल्पवयीन विद्यार्थी राहत होते. यातील दोन मोठ्या मुलांनी लहान मुलावर अतिप्रसंग केला. ही गंभीर वसतिगृहाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना समजताच त्यांनी तातडीने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. सदर मुलाची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी त्याला अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत रायगड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**ई-निविदा सूचना क्रमांक ३० सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, पालघर हे खालील कामांच्या बी-१ नमुन्यातील सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील **नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता** यांच्याकडून मागवित आहेत. कोरे निविदा संच निविदा उपलब्ध कालावधी दि. १२/०९/२०२४ ते १९/०९/२०२४ सकाळी ११.०० ते संध्या. ४.४५ वाजेपर्यंत (www.mahapwd.gov.in) या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर हे भरन पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

फटिप : सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०६ (सहा) कामे समाविष्ट आहेत. या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.gov.in 2) http://www.paytopwd.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष जी.एस.टी.वगळून | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | रा.मा. ७४ ते मान आठवलेपाडा रस्ता तयार करणे. ग्रा.मा. २८९ ता.जि. पालघर | रु.८२२३०९/- | ५०५४ ५११७-५३- मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ |
| २. | ग्रा.मा. ८२ ते करवेलपाडा टोकरेपाडा रस्ता तयार करणे. ग्रा.मा. २९० ता.जि. पालघर | रु. ८२२३०९/- | ५०५४ ५११७-५३- मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ |
| ३. | ग्रा.मा. ८२ ते करवेलपाडा टोकरेपाडा रस्ता तयार करणे. ग्रा.मा. २९० ता.जि. पालघर | रु. ८२२३०९/- | ५०५४ ५११७-५३- मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ |
| ४. | ग्रा.मा.१५ ते दशगांव कवेपाडा रस्ता तयार करणे. ग्रा.मा. २५६ ता.जि. पालघर | रु. ८२२६४१/- | ५०५४ ५११७-५३- मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ |
| ५. | रानी शिगाव खुताड रस्ता तयार करणे. ग्रा.मा. २३ ता.जि. पालघर | रु. ८२२७५१/- | ५०५४ ५११७-५३- मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ |
| ६. | देवखोप तांडेलपाडा रस्त्याची सुधारणा करणे. ग्रा.मा. ९२ ता.जि. पालघर | रु. ८२७६७२/- | ५०५४ ५११७-५३- मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. १२/०९/२०२४ ते दि. १९/०९/२०२४ पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. २३/०९/२०२४ सकाळी ११.०० नंतर शक्य झाल्यास.

जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/९११४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी,
पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम) - ४०१ ४०४.
दिनांक : ०८/०९/२०२४

**सही/-**
**(स.प्र. पाटील)**
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर

**जिमाका/पालघर/जाहि ७४/३७७/२०२४ दिनांक : ०६/०९/२०२४**

# विरार येथे भव्य दिव्य आरती स्पर्धा संपन्न




**विरार/प्रतिनिधी**

यंग स्टार्स ट्रस्ट अध्यक्ष, आमदार हितेंद्र ठाकूर आयोजित आध्यात्मिक, पावित्रता, निरागसता, संस्कार तसेच भारतीय संस्कृती जतन करणारी महाराष्ट्रातील सर्वांत मोठी, भव्य दिव्य आरती स्पर्धा साजरी झाली. १ सप्टेम्बर २०२४ रोजी यंग स्टार ट्रस्ट समन्वयक अजीव पाटील यांचे समन्वयातून कै.भास्कर वामन ठाकूर यांचे स्मृती प्रित्यर्थ आरती स्पर्धेचे आयोजन करण्यांत येते, अशी अनेक पारंपरिक आरत्यांची मेजवानी रसिकांना मिळाली. आजचे आरती स्पर्धेचे हे सोळाव्या वर्ष परिक्षक म्हणून मंगला मोहन परांजपे यांनी काम पाहिले. पारितोषिक वितरण समारंभ समाजसेवक किरण ठाकूर, माजी नगरसेविका सुरेखा कुरकुरे, चिरायु चौधरी परिक्षक मंगला परांजपे यांचे हस्ते पार पडला. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मिलिंद पवार, मिलिंद पोक्षे, मुग्धा लेले, भुषण चुरी, तानाजी पाटील यांनी सहकार्य केले. प्रथम पारितोषिक वाडवळ भजनी मंडळ, द्वितीय पारितोषिक समर्थ भजनी मंडळ, तृतीय पारितोषक श्रीमहालक्ष्मी प्रासादिक मंडळ, तर उत्तेजनार्थ पारितोषिक आरंभ आरती मंडळ, उत्कर्ष कनिष्ठ महाविद्यालय विवा कालेज यांना देण्यात आले.

# चोरीच्या संशयावरून एकाची हत्या

**ठाणे/प्रतिनिधी**

घोडबंदर येथील मानपाडा भागात चोरीच्या संशयातून एकाची चार सुरक्षा रक्षकांनी बेदम मारहाण करून हत्या केल्याचा प्रकार उघडकीस आहे. याप्रकरणी चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी चौघांना अटक केली आहे. पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी आरोपींनी बनाव रचला होता. राजेश यादव, प्रमोद कुमार यादव, गंगाराम यादव व प्रकाश मोहीते अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावे आहेत. तर प्रथमेश चव्हाण असे मृताचे नाव आहे. मानपाडा येथील भवानीनगरपरिसरातील इमारतीच्या २३व्या मजल्यावरील सदनिकेत एक जण जखमी अवस्थेत असल्याची माहिती पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला मिळाली होती.

09 TO 15 SEPTEMBER 2024 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 9/7/2024 11:26 PM Page 1



पान १ वरून....

## कौटुंबिक वाद भयंकर शिगेला पेटला...

जंगलातील ओहोळात फेकून दिले होते. याप्रकरणी दीर संदीप डावरे आणि नणंद सुमन करबट या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली आहे. सोमवारी सकाळच्या सुमारास पालघर तालुक्यातील सावरे गावानजीक असलेल्या ओहोळामधील पाण्यातील दगडाला बांधलेल्या अवस्थेत एक महिलेचा मृतदेह आढळून आला होता. पालघर तालुक्यातील सावरे हे अतिशय दुर्गम गाव असून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील दुर्वेस या गावापासून सुमारे ११ किमी अंतरावर वसले आहे. सावरे गावातील बरडे पाडा येथील जंगलातून वाहणाऱ्या ओहोळातील पाण्यात एका महिलेचा मृतदेह असल्याची माहिती सोमवारी सकाळी ११.३० वाजेच्या सुमारास गावचे पोलीस पाटील यांनी मनोर पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह पाण्याबाहेर काढल्यानंतर तो वाणीपाडा येथील सुश्मिता प्रवीण डावरे या महिलेचा असल्याचे निष्पन्न झाले. महिलेची अज्ञात व्यक्तींने हत्या करून मृतदेह ओहोळातील वाहत्या पाण्यातील दगडाला बांधून ठेवण्यात आला होता. तर महिलेची मुलगी मात्र गायब होती. मयत सुश्मिता डावरे हि आपल्या दोन वर्षाच्या मुलीसोबत गावाबाहेर असलेल्या शेतघरात राहत होती, तर तिचा पती एका मच्छीमार बोटीवर बाहेरगावी कामाला असल्याची माहिती स्थानिकांनी दिली. पालघर जिल्ह्याच्या दुर्गम आदिवासी भागात घडलेल्या या हत्याकांडामुळे खळबळ माजली असून या प्रकरणाची गंभीर दखल घेत पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मनोर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणवीर बयेस यांच्या नेतृत्वाखाली आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची वेगवेगळी पथके बनवून तपास सुरु करण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांनी मयत महिलेचा दीर संशयीत संदीप डावरे याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता सुरवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र पोलिसी खाक्या दाखवताच कौटुंबिक वादातून सततच्या भांडणामुळे आपली वहिनी सुश्मिता डावरे आणि पुतणीची हत्या हत्या करून दोन्ही मृतदेह चार किमी अंतरावरील जंगलातील निर्जन भागातून वाहणाऱ्या ओहोळातील पाण्यातील दगडाला बांधून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचे कबूल केले. यामध्ये बहीण सुमन करबट हिने देखील मदत केल्याचे आरोपीने कबुली दिली असून त्याने दाखवलेल्या जागेवरून चिमुकल्या पुतणीचा मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

## मैत्रीत रमेशला त्याच्या मित्रानेच दगा...

देखणी आणि सुंदर असल्याने ती कोणाच्या ही नजरेत भरत होती. रामकृष्ण आणि रमेश हे दोघे ही चांगले मित्र असल्याने आणि एका ठिकाणी काम करीत असल्याने दोघांना ही दारू पिण्याचे व्यसन होते. दोघे ही एकत्रच दारू प्यायला बसत होते. बऱ्याचवेळेला त्याची दारूची आणि जेवणाची पार्टी ही रमेशच्या घरी असायची. त्यावेळी रामकृष्ण आणि शालीनीची नजरा नजर होत होती. रामकृष्णला ती लाईन ही देत होती. त्यामुळे रामकृष्ण हा तिला भेटण्याच्या नादाने रमेशच्या घरी त्याच्या माघारी यायचा. ती ही त्याला कन्नडमध्ये भावोजी म्हणायची. तिच्या लाघवी बोलण्याने तो खुश व्हायचा कधी एकदा हिला आपल्या अंगाखाली घेऊन लोळवितो असे त्याला वाटत होते. बोलता बोलता तो तिला चोरटा स्पर्श करायचा. त्याचा तो चोरटा स्पर्श तिला ही आवडयाचा. रमेश आणि शालीनीच्या लग्नाला पाच वर्ष झाली. तरी ही त्यांना मुलबाळ झाले नव्हते. आई होण्याची शालीनीची इच्छा रमेश पुर्ण करू शकत नव्हता. हे तिला देखील माहिती होते. रात्रीच्या बेडवरच्या खेळात रमेश हा कमी पडत होता. त्यातूनच ती रमेशचा मित्र रामकृष्णला चिकटली होती. दोघे ही आता मनाने जवळ आले. तनाने जवळ येण्यासाठी दोघे ही संधी शोधत असताना एकदा रमेश बाहेर गावी गेला. नेमकी हिच संधी साधून रामकृष्ण त्याच्या घरी गेला. बोलता बोलता तो शालीनीशी लगट करीत असताना कळत नकळतपणे ती त्याच्या मिठीत शिरली. त्यावेळी त्याने तिची कमसीन जवानी कुस्करून तिच्या नवऱ्यापेक्षा ही भारी सुख तिला दिले. तेंव्हापासून ती त्याची दिवानीच झाली. त्या दोघांचे संबंध त्यावेळेपासून लपून छपून सुरू झाले. रामकृष्ण हा तिला काय पाहिजे काय नको ते पाहत होता. त्यातून त्या दोघांचे संबंध वाढीस लागले. हल्ली ती नवरा रमेश याला किमंत देत नव्हते. आपल्या घराकडे आपला मित्र आपल्या माघारी येत आहे. त्याचे आणि आपल्या बायकोचे तसले संबंध आहेत याची कुण कुण त्याला ही लागलेली होती. त्यामुळे रमेश हा घरी येवून पत्नी शालीनी बरोबर भांडण काढत होता. तिला मारहाण ही करीत होता.तो रोज या कारणातून मारहाण करीत असल्याने ती ही त्याच्या भांडणाला वैतागलेली होती. भांडणात ती कधी कधी रमेशच्या मर्दानगीवर बोट ठेवू लागल्याने तो तिच्यावर जास्त चिडत होता. आपल्या नवरा बायकोच्या संबंधात आपल्या जवळच्या मित्राने विष कालविल्याने रमेश हा रामकृष्णवरही चिडून होता. एकदा दोनदा रमेशने दारूच्या नशेत रामकृष्णला तु जे करायला लागला आहेस ते बरोबर नाही. माझ्या संसंरात ढवळाढवळ करू नकोस माझ्या बायकोचा नाद सोडून दे. तिला तुझ्या नादाला लावू नकोस असे सांगितले. त्यावेळी रामकृष्णने मुद्दामच त्याच्या सांगण्याकडे दुर्लक्ष केले.कारण त्याला रमेशच्या बायकोचा नाद सोडायचा नव्हता. तिच्यासाठी तो काय वाटेल ते करायला तयार होता. ती ही त्याच्यासाठी काय वाटेल ते करायला तयार होती. त्यानंतर ही रामकृष्ण हा त्याच्या माघारी तो जात होता. एकदा अचानक दुपारच्या सुमारास रमेश हा दारूच्या नशेत घरी आला. त्यावेळी त्याच्या घराचा दरवाजा बंद होता. दारात जेन्टस चप्पल होते. त्याने पत्नी शालीनीला हाका मारायला सुरूवात केली. परंतु आतून कोणताच प्रतिसाद त्याला मिळाला नाही. म्हणून त्याने मागील बाजुच्या खिडकीतून आत पाहिले असता त्याला त्याची पत्नी शालीनी आणि मित्र रमेश हे दोघे ही नको त्या अवस्थेत दिसले. ती त्याच्या अंगावर बसून कामसुख घेत होती. आतील दृश्य बघून तो चवताळला. त्याने आरडा ओरडा करायला सुरूवात केल्यावर त्या दोघांनी आपआपले कपडे सावरून दरवाजा उघडला. त्यावेळी रमेश हा रामकृष्णला मारायला त्याच्या अंगावर गेल्यावर त्याला त्याच्या तावडीतून शालीनीने सोडविले. त्यावेळी रागाच्या भरात असणाऱ्या रमेशने त्याला बघून घेण्याची भाषा केली.जाता जाता रामकृष्णने ही त्याला डिवचत मी तुझ्या बायकोला ठेवून घेतले आहे.ती माझी आहे तुला काय करायचे ते कर जा असे म्हणून तो तेथून निघून गेला. तो गेल्यावर रमेशचा रागाचा पारा वाढला होते. त्याने पत्नी शालीनीला धु धू धुतले. परंतु त्याचा राग काही शांत झाला नाही. तो दारूच्या गुत्यावर जाऊन आपल्या घशात त्याने दारू रिचवली. त्यावेळी तो कुठे शांत झाला. दोघे ही सांगून ऐकत नाहीत म्हणून रमेशने दोघांना ही धडा शिकविण्याचा विचार केला.बायको मित्रालाच चिकटल्याने त्याची ही चार चौघांत इज्जत जात होती.त्याला बाहेर कुठे तोंड दाखविणे ही मुश्किल झाले होते. रामकृष्णने आपले जीवन बरबाद केल्याचे त्याला वाटू लागले. काही केल्या तो आपल्या बायकोचा नाद सोडायला तयार नाही त्याला कायमचा धडा शिकविला पाहिजे या विचारापर्यंत तो आला. आपल्या बायकोच्या यजमानाला ठेवले नाही तर ती काय करेल तिला गप्प बसण्याशिवाय पर्याय नाही हे त्याने मनोमन ताडले. रामकृष्णला कुठे आणि कसे मारायचे याचा पुर्ण प्लॅन केला. ते दोघे ही केम्पेंगौडा विमानतळावर सफाई कामगार असल्याने त्या विमान तळाची सपुंर्ण माहिती रमेशला होती. विमानतळावर साधी पिन ही न्यायला परवानगी नाही मग आपण रामकृष्णाला मारण्यासाठी आपले हत्यार कसे काय नेऊ शकतो याचा तो विचार करीत असताना त्याने एक शक्कल लढविली. विमानतळावरील कर्मचाऱ्यांना आत ने आण करण्यासाठी बसची सेवा असते. त्या बसमध्ये बसून गेले तर नेलेले सामान ही स्कॅन होत नाही हे त्याला माहित होते. घटनेच्या दिवशी म्हणजे रामकृष्ण याची डयुटी दुपारनंतर आहे हे त्याला माहित होते. तो आता कुठे असेल याची ही त्याला कल्पना होती. कर्मचाऱ्याना आत नेण्यासाठी ज्यावेळी बस आली. त्यावेळी तो त्या बसमध्ये बसला. आपल्या बॅगेत त्याने एक धारदार कुऱ्हाड लपून ठेवली. ती कुऱ्हाड त्याने बसमधून उतरून एके ठिकाणी कोणाला काही दिसणार नाही अशा पध्दतीने लपवून ठेवली. तो विमानतळावरील कर्मचारी असल्याने त्याच्या अंगावर कर्मचाऱ्याचा ड्रेस आणि ओळखपत्र होते. त्यामुळे तेथे वावरताना त्याला कुणी विचारले नाही. ज्यावेळी आपली डयुटी संपवून रामकृष्ण हा टर्मिनल १ मधील अराव्हलसमध्ये आला. त्यावेळी तेथेच शौचालयाजवळ लपून बसलेल्या रमेशने त्याच्या डोक्यावर आणि खांद्यावर कुऱ्हाडीने जबर वार केले. त्यासरशी रामकृष्ण हा रक्ताच्या थारोळ्यात खाली पडला.एवढयावरच त्यावेळी रमेश गप्प बसला नाही. त्याने आणखी दोन तीन वेळा त्याच्या अंगावर कुऱ्हाडीने वार केले. रक्ताचे शिंतोडे रमेशच्या शर्टावर उडाले. रामकृष्ण याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने संपुर्ण केंम्पेंगौडा विमानतळावर खळबळ उडाली. या घटनेची माहिती विमानतळ पोलीसांना समजाताच ते ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. तोपर्यत विमानतळा वरील सिक्युरिटी गार्डनी ही रमेशला घेरले. त्यामुळे रमेशला पळून जाण्याची संधीच मिळाली नाही. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी विमानतळावरील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला.त्यानंतर विमानतळ पोलीसांनी रमेशला ताब्यात घेतले.त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने पोलीसांना सांगितले की,मयत रामकृष्ण आणि माझ्या बायकोचे संबंध होते ते दोघे ही मला रंगेहात सापडले होते.तरी ही मी त्या दोघांना एकमेकांचा नाद सोडायला सांगितले परंतु रामकृष्ण हा काही माझ्या बायकोचा नाद सोडायला तयार नव्हता.म्हणून मी रागाच्या भरात त्याचा कुऱ्हाडीने घाव घालून खून केला.त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने या घटनेची फिर्याद मयत रामकृष्ण याच्या पत्नीकडून घेतली.तिने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी रामकृष्ण (४२) याच्या खुन प्रकरणी रमेश (३०) याच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर हजर केले. मा.कोर्टाने त्याची रवानगी कऱ्याप्पा जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी रमेशकडून गुन्हयात वापरलेली कुऱ्हाड आणि रक्ताने माखलेला शर्ट जप्त केला. या घटनेचा पुढील तपास विमानतळ पोलीस करीत आहेत.

## सुट्ट्या पैशांवरून दारूड्यांशी वाद...

असल्याने त्यांना मराठी ही कळत होते. ते आपल्या भाषेबरोबर मराठी ही सराईतपणे बोलत होते. त्याची पत्नी ही एका इंग्रजी मिडियम शाळेत शिक्षिका होती. गेल्या अनेक वर्षापासून ते आपल्या पत्नी मुलासह हुपरी येथे भाडयाने राहत होते. अलिकडच्या पाच सहा महिन्यात त्याची पत्नी आपल्या दोन्ही मुलांना घेऊन केरळ येथील आपल्या मुळ गावी गेली होती. त्यामुळे गिरीश हे खोली ऐवजी दुकानातच राहयला होते. रात्री अपरात्री केंव्हा ही पंक्चर काढायला गाडया आल्या की, ते पंक्चर काढत होते. हल्लीची तरूणाई आणि अल्पवयीन मुले गुन्हेगारीकडे कळत नकळतपणे वळत आहेत ही खेदाची गोष्ट आहे. त्यांना सहज जरी कुणी बाजुला सर म्हटले की, त्यांना राग येत असतो. त्यावेळी ते रागाच्या भरात काय करतील याचा नेम नाही. गुरूवार दि.२९ ऑगस्ट रोजी नेहमीप्रमाणे गिरीश हे हॉटेलमध्ये जेवण करून आपल्या दुकानात झोपायला आले.ते झोपण्याची तयार करीत असताना अचानक त्याच्या दुकानासमोर एका दुचाकीवरून एक २० ते २२ वर्षीय तरूण आणि त्याच्या मागे एक सतरा वर्षीचा मुलगा आला. त्याच्या दुचाकीत हवा कमी असल्याने त्याची दुचाकी गाडी चळत होती. म्हणून ते दोघे ही पिल्लाई याच्या दुकानात गाडीतील चाकात हवा भरण्यासाठी म्हणून आले.ते दोघे ही फुल्ल दारूच्या नशेत होते. त्यांनी पिल्लाई यांना चाकात हवा भरण्यास सांगितले.पिल्लाई यांनी कोणते ही आढेवेढे न घेता हवा भरण्याची पाईप आणि चेक करण्याचे मिटर घेऊन त्याच्या दुचाकीतील चाकात हवा भरली. हवा भरल्यानंतर पिल्लाई यांनी हवा भरण्याचे पाच रूपये मागितले. त्या दोघांच्याकडे ही पाच रूपये सुट्टे नव्हते. त्यांनी पिल्लाई यांना उदया सकाळी पैसे देतो असे म्हटले. त्यावर पिल्लाई यांनी मी सुट्टे देतो पैसे दया असे म्हटले.पिल्लाई यांना त्याच्याकडे फार फार तर पन्नास रूपये किंवा शंभर रूपये असतील असे वाटले म्हणून ते त्या दोघांना सुट्टे करून देतो असे सांगितले. त्यावर त्या तरूणाने पिल्लाई यांना ५०० रूपयांची नोट काढून दिली.पाच रूपयासाठी कुणी पाचशे रूपये सुट्टे देतील का? असे ते त्या दोघांना म्हटले. ते दोघे ही आमच्याकडे पाचशे रूपये आहेत. आमच्याकडे पाच रूपये सुट्टे नाहीत असे म्हणून तेथून आपली गाडी घेऊन जावू लागले. यावर पिल्लाई त्या दोघावर चिडले. त्याची गाडी आडवून धरली.पिल्लाई यांनी ही जेवणाअगोदर थोडी दारू आपल्या घशात रिचवली होती.त्याची नशा त्यांना ही होती. त्या नशेत त्यांनी त्या दोघांना ही सुट्टे पैसे नाहीत तर मग हवा भरण्यास का सांगितले म्हणून वाद घालू लागले. तसे ते दोघे ही दारूच्या नशेत असल्याने त्यांनी ही मामा उदया सकाळी पैसे देतो असे म्हणत होते. बघता बघता त्या तिघांत वाद वाढू लागला. ते दोघे ही गिरीश यांना उलटे बोलू लागल्यावर गिरीश यांना मला आताच पाच रूपये पाहिजेत. तुम्ही येथे गाडी लावा आणि सुटे करून मला पाच रूपये आणून दया असे सांगितले. पाच रूपयासाठी हा दुकानदार आपली गाडी येथे ठेवायला सांगतो म्हणून याचा राग त्या दोघांना आला. तो तरूण आणि अल्पवयीन मुलगा हे दोघे ही गिरीश याच्या अंगावर जात त्यांना मारहाण करू लागले.म्हणून गिरीश याने त्या तरूणाच्या कानाखाली लावली. याचा राग त्याला आला. तो त्याच्या अंगावर जात होता. त्यावेळी गिरीश यांनी त्याच्यावर आपल्याकडील टॉमीने वार करण्याचा प्रयत्न केला. त्याचा वार चुकवित त्या तरूणाने त्याच टॉमीने गिरीश याच्या डोक्यात जोरात प्रहार केला. त्यासरशी गिरीश याचे डोके फुटले. त्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होऊ लागला. त्याचवेळी त्या तरूणासोबत असणाऱ्या अल्पवयीन मुलाने आपल्याकडील चाकूने गिरीश याच्या पोटात सपासप असे वार केले. त्या वारात गिरीश हे रक्ताच्या थारोळ्यात पडले. त्यांचा आपल्या हातून खून झाला आहे हे लक्षात त्या दोघांच्या आल्यावर त्यांनी गिरीश यांना त्यांच्या दुकानात ढकलून शटर बाहेरून लावून तेथून रात्रीच्या अंधारात निघून गेले. त्याचवेळी या घटनेनंतर केरळहून त्याच्या पत्नीने गिरीश याच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.परंतु गिरीश याच्या मोबाईल फोनची रिंग वाजत होती पण ते फोन काही उचलत नव्हते. त्यावेळी त्याच्या पत्नीने बराच वेळ त्याच्या मोबाईलवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला. शेवटी तिने कंटाळून गिरीश याचा मित्र दशरथ वसंत चव्हाण याच्या मोबाईलवर संपर्क करून गिरीश हे मोबाईल उचलत नाहीत ते कुठे गेले आहेत का बघा? किंवा ते दुकानात आहेत का बघा?असे चव्हाण यांना सांगितल्यावर काही वेळात चव्हाण यांनी गिरीश याचे पेट्रोल पंपाजवळील पंक्चर काढण्याचे दुकान गाठले.त्याच्या दुकानाचे शटर बंद होते. परंतु त्या शटरला बाहेरून कुलूप नव्हते. दुकानाच्या आतील आणि बाहेरील लाईट चालू होती. चव्हाण यांनी गिरीश यांना हाका मारल्या परंतु आतून काहीच रिप्लाय आला नसल्याने गिरीश हा दारूच्या नशेत झोपला आहे काय अशी शंका चव्हाण यांना आली. त्यांनी शटर उघडून आत पाहिले असता गिरीश हे रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. त्याच्या डोक्यावर जाड वस्तुने प्रहार केल्याने त्याचे डोके फुटून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाला होता.तसेच त्याच्या पोटात ही चाकूने खुपसले असल्याचे दिसत होते. बाजुलाच रक्ताने माखलेला लोंखडी टॉमी होता.ते आरडा ओरडा करीतच बाहेर आले. आजुबाजुला ही इतर दुकाने बंद होती. रस्त्यावर ही कुणी नव्हते. तुरळक वाहतूक सुरू होती. त्याच्या ओरडण्याने रस्त्यावरून जाणारे येणारे दोघे चौघे थांबले. ही घटना बघून दशरथ चव्हाण यांनी लगेच याची माहिती केरळ येथील मयत गिरीश याची पत्नीला दिली. तिने या घटनेची माहिती हुपरी पोलीसांना देण्यास चव्हाण यांना सांगितले. चव्हाण यांनी हुपरी पोलीसांना या घटनेची माहिती दिल्यावर हुपरी पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी घटनेची माहिती घेऊन घटनास्थळी श्वान पथकाला आणि फॉरेन्सिक लॅबला पाचारण केले. श्वान ही थोडया अंतरावर जाऊन घुटमळले.घटनास्थळी अप्पर पोलीस अधिक्षक निकेश खाटमोडे पाटील पोलीस उपाधिक्षक समीरसिंह साळवे आणि पोलीस निरी.एन.आर.चौखंडे यांनी भेट दिली. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी हुपरी पोलीसांना या घटनेचा तपास जलद गतीने करून यातील संशयीतांच्या मुसक्या आवळण्याच्या सुचना पोलीसांना दिल्या. पोलीसांनी या घटनेचा पंचनामा करून मृतदेह उतरीय तपासणीसाठी कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात पाठवून दिला. गिरीश पिल्लाई याचा खून हा अनैतिक संबंधातून किंवा आर्थिक व्यवहारातून झाला असल्याचा अंदाज व्यक्त करून पोलीसांनी या घटनेचा तपास सुरू केला. हुपरी पोलीसाबरोबरच या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस ही करीत होते. या पथकाला घटनेच्या रात्री गिरीश याच्या दुकानात हवा भरण्यासाठी हुपरी शाहूनगर शिंगाडे गल्लीतील नचिकेत विनोद कांबळे हा आला असल्याचे समजले. तसेच त्याच्या बरोबर आणखी एक तरूण असल्याची माहिती त्यांना मिळाली. घटना परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी पोलीसांनी केली असता त्यात नचिकेत कांबळे आणि एक अल्पवयीन दिसत होता. घटनेनंतर २४ तासाच्या आत पोलीसांनी संशयावरून नचिकेत कांबळे आणि त्या अल्पवयीन तरूणाला ताब्यात घेतले. त्यांना हुपरी पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता ते दोघे ही ना चा पाढा वाचत होते. त्यांना पोलीसी खाक्या दाखविल्यावर त्यांनी आपला गुन्हा कबुल करून आणखी दोघांची नावे त्यांनी पोलीसांना सांगितली. त्यामुळे या घटनेला कलाटणी मिळाली. अबिंका नगर येथील अजय दिलीप शिंगे याला गिरीश पिल्लाई याचे पंक्चर काढण्याचे दुकान पाहिजे होते. गिरीशचा धंदा ही फार्मात होता. त्यामुळे त्याचा धंदा कढुन घेऊन आपणच नवीन धंदा करावा असे शिंगे याला वाटत होते.बऱ्याबोलाने गिरीश हा धंदा सोडणार नाही याची कल्पना अजय शिंगे याला होती. त्याने एकदा दोनदा गिरीश याला धंदा देण्याविषयी विचारले होते. त्यावेळी गिरीश याने मी का बरे तुला माझा धंदा देऊ आणि मी काय पोटाला खाऊ सांगितले. तो आपल्यालाही धंदा चालवायला देत नाही म्हणून अजय शिंगे याने आपला मित्र आर्यन घुणके याला गिरीश याची गेम वाजव मी तुला दोन लाख रूपये देतो असे सांगितले. या दोन लाख रूपयासाठी आयर्न याने गिरीशचा कायमचा काटा काढण्याची सुपारी शिंगे याच्याकडून घेतली.घुणके याने विचार करून याकामी नचिकेत कांबळे याला कामाला लावले. नचिकेत याने आपला जवळचा मित्र अनिकेत कांबळे याला आणि एका अल्पवयीन मित्राला यात सामील करून घेतले. त्यांनतर अजय शिंगे याच्यासह सर्वानी मिळून गिरीश याचा गेम करण्याचा प्लॅन केला आणि त्यांनी या घटनेला मुर्त रूप दिले. घटनेची फिर्याद मयत गिरीश पिल्लाई याचा मित्र दशरथ वसंत चव्हाण याने हुपरी पोलीसात दिल्यावर पोलीसांनी गिरीश विश्वनाथ पिल्लाई (वय ४७) याच्या खून प्रकरणी हुपरी येथील नचिकेत विनोद कांबळे (वय २२) आणि त्याचा अल्पवयीन मित्राच्या आणि अजय शिंगे अनिकेत कांबळे आर्यन घुणके याच्या विरोधात विरोधात भा.दं.वी.कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्या दोघांना इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले.मा. न्यायालयाने नचिकेत विनोद कांबळे आर्यन घुणके, अजय शिंगे अनिकेत कांबळे यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. तर अल्पवयीन मुलाची रवानगी बाल सुधार गृहात केली. या दरम्यान पोलीसांनी त्या पाच जणांच्याकडून गुन्हयात वापरलेली मोटार सायकल, लोंखडी टॉमी आणि चाकू जप्त केला. या घटनेचा तपास हुपरी पोलीस स्टेशनचे पो.निरी. एन. आर. चौखंडे याच्या मार्गदर्शनाखाली हुपरी पोलीस करीत आहेत. मयत गिरीश याचा पंक्चर काढण्याचा धंदा जोमात होता. पण तो केरळहून येथे येऊन आपला धंदा फार्मात चालवित आहे हे अजयला खटकले. त्याने त्याच्या ताब्यातून धंदा काढून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात यश न आल्याने अजयने गिरीश याच्या हत्येची सुपारी देऊन त्याची गेम केली. खरे तर अजय हा दुसरीकडे आपला धंदा काढू शकत होता. परंतु त्याला चालू असलेला गिरीशचाच धंदा पाहिजे होता. त्यामुळे त्याची खुन्नस वाढली आणि त्यातूनच त्याने गिरीशीच्या हत्येची सुपारी दिली.

पान ८ वरून....

## वसई न्यायालयाची जमीन आठवड्यात ...

पाठपूरावा करण्याबाबत आश्वासन दिले. बार कौन्सिल ऑफ म्हाराष्ट्र व गोवाचे विद्यमान सदस्य मा. ॲड.संग्राम देसाई ह्यांनी वकीलांच्या आंदोलनाला भेट देऊन त्यांच्या मागण्या समजून घेतल्या व त्यांनी वकीलांना आश्वासन दिले की, या मागणीबाबत मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदय पाठपूरावा करून सदर प्रश्न तडीस लावतील. त्यानंतर त्यांनी मा. नामदार रविंद्र चव्हाण ह्यांना फोन लावून त्यांच्याशी बोलणे केले व मा. मंत्री महोदय यांनी फोनवर एका आठवडयाच्या आत जमीन कोर्टाच्या नावे करण्याबाबत आश्वासीत केले. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून सर्व वकीलांनी सुरू केलेले आंदोलन तात्पुर्ता स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

## नैसर्गिकरित्या वाढलेल्या रानभाज्यांना...

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघाचे सचिव आशिष राणे यांनी केले, तर शेवटी आभार नरेंद्र पाटील यांनी मानले. या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री उपाध्यक्ष भरत म्हात्रे, खजिनदार अरुण सिंग, शिवकुमार शुक्ला, दत्ता पाटील, नितांत राऊत, राजू सोनी यांनी विशेष मेहनत घेतली. दरम्यान वसई विरार महापालिका व वसई तालुका पत्रकार संघाने आमच्या महिला बचत गटाला या रानभाज्या प्रदर्शनातून एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे अजूनही शहरांतील लोकांना रानभाज्यांची माहिती नाही. त्यामुळे या प्रदर्शन व विक्री कार्यक्रमातून एक वेगळी ओळख झाली आहे. त्याचबरोबर एक उत्तम चित्र पाहायला मिळाले की शाळेतील विद्यार्थी वर्गांनी केवळ रान भाज्या खरेदी केल्या नाही तर त्याची माहिती ही घेतली, असे बोरशेत येथील उमेद अभियान, जागृती महिला ग्रामसंघाच्या प्रियाताई आंबेकर यांनी सांगितले. तर केडीएमपी हायस्कूलच्या आवारात भरलेले रानभाज्या प्रदर्शन हे पुस्तकामध्ये असलेल्या रानभाज्यांची वास्तव ओळख विद्यार्थ्यांना झाली. महापालिका व वसई तालुका पत्रकार संघाने असे उपक्रम विविध शाळेत राबवावे जेणेकरून शहरातील शेती कमी झाल्यानं भाज्या कश्या असतात व ऑरेंग्निग भाज्यांची माहिती विद्यार्थ्यांना मिळू शकेल, असे कृष्णा मोरू पाटील देशमुख हायस्कूलचे अधीक्षक माणिकराव दुतोंडे सर यांनी सांगितले.

## डॉ. शितल कोरडकर राज्यस्तरीय...

नवनवीन पद्धतीने शिकविण्याकडे त्यांचा कल असतो. प्रत्येक महिन्यात महाविद्यालयात नाविन्यपूर्ण उपक्रम विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या नेतृत्वात राबविण्यात येतात. विद्यार्थ्यांना सामाजिक कार्याची जाण व्हावी याकरिता विविध सामाजिक संस्थांशी संलग्नित राहून सामाजिक उपक्रम आयोजन करण्यामध्ये महाविद्यालय नेहमीच अग्रेसर असते. आजपर्यंत अनेक संस्थांमध्ये त्यांना पाहुणे व्याख्याते, परीक्षक, मार्गदर्शक म्हणून आमंत्रित केले आहे. त्यांच्या या सर्व कार्याची दखल घेऊन त्यांना मराठी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री नयना आपटे यांच्या हस्ते सदर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. या आनंददायी प्रसंगी सहकाऱ्यांनी, हितचिंतकांनी, वरिष्ठांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. सदर प्रसंगी डॉक्टर शितल कोरडकर यांनी सर्वप्रथम कार्यरत असलेल्या संस्थेचे, ज्या संस्थेने राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले. त्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे, आजपर्यंतच्या प्रवासात मार्गदर्शन आणि सहकार्य केलेल्या सर्व व्यक्तींचे आभार मानले आहेत.

# नैतिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदाऱ्या शिकवणे -भारत सातपुते

**औसा/प्रतिनिधी**

शिक्षकांच्या महत्त्वाबद्दल सखोल विचार मांडले. त्यांनी सांगितले की, शिक्षक हे समाजाचे शिल्पकार असतात. त्यांनी विद्यार्थ्यांना फक्त ज्ञानच नाही तर नैतिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदाऱ्या शिकवणे आवश्यक असल्याचे ठाम पणे मांडले.शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी करायला हवी. त्यांनी शिक्षणाच्या बदलत्या परिभाषेवरही चर्चा केली आणि शिक्षण प्रणालीतील सुधारणा आणि नवीन तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला. शिक्षकांच्या कर्तव्यनिष्ठेचे आणि विद्यार्थ्यांच्या जीवनातील त्यांच्या अपरिहार्य भूमिकेचे महत्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर राहण्याचा सल्ला दिला. त्यांनी सांगितले की, व्यसन कोणत्याही प्रकारचे असो, ते विद्यार्थ्यांचे शारीरिक, मानसिक, आणि शैक्षणिक जीवन नष्ट करू शकते, असे श्री वेताळेश्वर शिक्षण संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयांत शिक्षक दिनानिमित्त लेखक, कवी भारत सातपुते बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख व्याख्याते महाराष्ट्रातील अग्रगण्य लेखक, कवी, आदर्श शिक्षक, शिक्षण क्षेत्रातील एक नामांकित व्यक्तिमत्त्व भारत सातपुते, संस्थेचे मान्यवर नंदकिशोर बावगे, प्राचार्य डॉ.नितीन लोणीकर, ज्ञानसागर विद्यालयाचे मुख्याध्यापक कालिदास गोरे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर भाषण संस्थेचे मान्यवर नंदकिशोर बावगे यांनी केले. या भाषणात विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व समजून घेणे खूप आवश्यक आहे. शिक्षण केवळ ज्ञान वाढवण्याचे साधन नाही, तर ते व्यक्तिमत्व विकास, समाजातील योगदान आणि भविष्यातील संधींसाठी देखील अत्यंत महत्वाचे आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला स्वतंत्र विचार करण्याची क्षमता प्राप्त होते, समस्यांचे योग्य उपाय शोधता येतात, आणि जीवनात पुढे जाण्याचे मार्ग स्पष्ट होतात, असे मोलाचे मार्गदर्शन केले. शिक्षक दिनानिमित्त प्राचार्य डॉ नितीन लोणीकर, प्रा. दिपक जोशी, प्रा. योगेश हरंगुळे यांनीही आपले विचार व्यक्त केले. महाविद्यालयांत विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी वेगवेगळ्या खेळाचे आयोजन केले आणि प्राद्यापकांनी त्याला भरभरून प्रतिसाद दिला. तसेच लातूर कॉलेज ऑफ फार्मसी हासेगाव महाविद्यालयासह ज्ञानसागर विद्यालय हासेगांव, लातूर कॉलेज ऑफ डी फार्मसी लातूर, राजीव गांधी पॉलिटेक्निक कॉलेज हासेगाव, लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी हासेगाव, लातूर कॉलेज ऑफ आय टी आय हासेगाव, गुरुनाथ अप्पा बावगे इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल हासेगाव, लातूर कॉलेज ऑफ सायन्स लातूर, प्राचार्य आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन सुमित टरके आणि दीपाली बिराजदार या चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांनी केले.

# वासिंद पोलीस ठाण्यातील तीन कर्मचाऱ्याचे निलंबन

## तरुणाच्या मृत्यूनंतर ठाणे ग्रामीण पोलिसांची कारवाई






**शहापूर/प्रतिनिधी**

२४ वर्षीय प्रियकराने अल्पवयीन प्रेयसीचे अपहरण केल्याची तक्रार मुलीच्या नातेवाईकाने वाशिंद पोलीस ठाण्यात दिली होती. या तक्रारीची दखल घेत पोलीस पथकाने प्रियकर आणि प्रेयसीचा शोध सुरू केला असता, एक महिन्याच्या तपासाअंती दोघे मध्यप्रदेश राज्यातील एका पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याचे समोर आले. त्यानंतर दोघांना ताब्यात घेऊन राजधानी एक्सप्रेसने येत असतानाच प्रियकराचा धावत्या ट्रेनमधून पडून संशयास्पद मृत्यू झाला होता. या प्रकरणी पोलिसांनी त्याने ट्रेनच्या बोगीमधील टॉयलेटच्या खिडकीतून उडी मारून आत्महत्या केल्याचे सांगितले. मात्र, प्रियकराच्या नातेवाईकांनी ग्रामीण वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे आमचा मुलगा पोलिसांच्या ताब्यात असताना त्याने आत्महत्या नव्हे तर त्याची हत्या झाल्याची तक्रार दिली. या तक्रारीवरून एक पोलीस उपनिरीक्षक आणि दोन पोलीस अंमलदार अशा तिघांना निलंबित करून त्यांची चौकशी सुरू केल्याने ठाणे ग्रामीण पोलीस दलात खळबळ उडाली आहे. अनिकेत जाधव (वय २४) असं मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भिवंडी तालुक्यातील पडघा पोलीस ठाण्यातील पाच्छापूर येथील मृतक अनिकेत जाधव आणि शहापूर तालुक्यातील अल्पवयीन मुलगी या दोघांमध्ये प्रेम होतं. प्रेमातून त्यांनी पळून जाण्याचा निर्णय घेतला असता २५ जुलै रोजी दोघेही लग्न करण्याच्या उद्देशाने पळून गेले. मात्र, त्यावेळी मुलीचे अपहरण मृतक अनिकेत याने केल्याची तक्रार मुलीच्या नातेवाईकाने वाशिंद पोलीस ठाण्यात दिली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस पथकाने दोघांचा शोध सुरू केला असतानाच, ते महिनाभरापासून मध्यप्रदेश राज्यातील एका शहरात असल्याची माहिती वाशिंद पोलिसांना मिळाली. वाशिंद पोलिसांनी मध्यप्रदेशातील पोलिसांच्या मदतीने वाशिंद पोलीस आणि मुलीच्या नातेवाईकांनी मध्यप्रदेश येथील पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्या ठिकाणाहून अनिकेत आणि त्याच्यासोबत असलेल्या त्याची प्रेयसी या दोघांना २५ ऑगस्ट रोजी मध्यप्रदेश येथून ताब्यात घेऊन रेल्वेने महाराष्ट्र राज्यात आणण्यात येत होतं. राजधानी एक्सप्रेस ग्वालियर रेल्वे स्टेशननजीक असलेल्या मुराई रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत ट्रेन येताच अनिकेत याने बोगीच्या टॉयलेटच्या खिडकीतून उडी मारून आत्महत्या केल्याचं पोलिसांनी त्यावेळी सांगितले. त्यामुळं त्याचा अपघाती मृत्यू झाल्याची नोंद मुराई रेल्वे पोलीस ठाण्यात करण्यात आली होती.

दरम्यान, अनिकेतचा मृत्यू हा पोलिसांच्या ताब्यात असताना झाल्याने अनिकेतच्या नातेवाईकांनी अनिकेतचा मृत्यू नव्हे तर त्याचा घातपात मुलीच्या घरच्यांनी केल्याचा आरोप केला होता. विशेष म्हणजे पोलिसांच्या ताब्यात असतानाही अनिकेतचा रेल्वे अपघातात मृत्यू होणे एक संशयास्पद असून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी अनिकेतच्या कुटुंबियांनी केली. याबाबत सखोल चौकशी न झाल्यास उग्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा रिपाइंचे किरण चन्ने यांनी दिला होता. या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन ठाणे ग्रामीण एसपी डॉ. स्वामी यांनी मृत अनिकेतला मध्यप्रदेश मधून ताब्यात घेणारे वाशिंद पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक वांगड, पोलीस अंमलदार जोगदंड आणि चलवादी या तिघांना ३१ ऑगस्ट रोजी निलंबित करून त्यांची चौकशी सुरू केल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक हर्षवर्धन बर्वे यांनी दिली आहे.

### मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत सरकारला भरभरुन लावला चुना


# पत्नीच्या नावे 30 फॉर्म भरले, २६ अर्जांचे पैसे बँक खात्यात जमाही झाले!

**सातारा/प्रतिनिधी**

राज्य सरकारनं महाराष्ट्रातील पात्र महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेद्वारे दरमहा १५०० रुपये दिले जातात. या योजनेचा राज्यातील कोट्यवधी महिलांनी लाभ घेतला आहे. एकाच महिलेच्या नावे ३० वेगवेगळे अर्ज, वेगवेगळ्या आधार कार्डचा वापर करुन एकाच मोबाईल क्रमांकाचा वापर करत मिळणारी रक्कम लाटल्याचा प्रकार घडला आहे. साताऱ्यातील एका व्यक्तीनं पत्नीच्या नावे ३० अर्ज दाखल करुन एकच मोबाईल नंबर नोंदवला केले. या प्रकरणात सहकारी बँकेच्या खात्यात आतापर्यंत २६ अर्जांची रक्कम जमा झाली आहे. या प्रकरणातील संबंधित व्यक्तीनं एकाच पत्नीचा फोटो वेगवेगळ्या पोशाखात काढून २७ महिला असल्याचं दाखवलं असल्याचं देखील उघड झालं आहे, या प्रकरणी पनवेल तहसिलदार कार्यालयात तक्रार दाखल करण्यात आली आहे. खारघर येथील रहिवासी असलेल्या पूजा महामुनी यांचा अर्ज दुसऱ्या मोबाइल क्रमांकावरुन दाखल करुन मजूर करण्यातआल्याचं निदर्शनास आलं आहे. महामुनी यांनी पनवेलमधील भाजपचे माजी नगरसवे निलेश बाविस्कर यांना अर्ज दाखल करण्यासाठी २८ ऑगस्ट रोजी मदत मागितली. २९ ऑगस्टला महामुनी यांनी मोबाईल नंबर नोंदवून लॉगीन करण्याचा प्रयत्न केला असता लाडकी बहीण योजनेचा अर्ज दाखल आणि मंजूर करण्यात आल्याची माहिती दाखवण्यात आली, यामुळं हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. निलेश बाविस्कर यांनी यानंतर अधिक चौकशी करुन त्या मेसेजमध्ये मिळालेल्या फोन नंबरवर फोन केला असता संबंधित व्यक्तीनं तो सातारा येथील असल्याचं सांगितलं. संबंधित व्यक्तीला निलेश बाविस्कर यांनी ओटीपी शेअर करायला सांगितला, त्या व्यक्तीनं तो दिला देखील. निलेश बाविस्कर यांनी सामाजिक कार्यकर्त्या कांचन बिर्ला यांच्या मदतीनं माहिती घेतली असता ३० लाभार्थी महिलांची खाती एकाच मोबाईल नंबरला लिंक करण्यात आल्याचं समोर आलं. त्यापैकी २७ लाभार्थ्यांचं नाव एक सारखं होतं मात्र आधार कार्ड नंबर वेगवेगळे होते. यापैकी २६ अर्ज मंजूर झाले असून चार अर्ज मंजूर झालेले नाहीत. यामुळं महामुनी, बिर्ला आणि बाविस्कर यांनी पनवेल तहसिलदारांकडे तक्रार दिली. संबंधित व्यक्तीनं पासवर्ड देखील बदलले असल्याचं समोर आलं आहे. खारघर येथील महामुनी यांचा अर्ज वारंवार भरून देखील सबमिट होत नसल्याने त्यांनी भाजपचे माजी नगरसेवक निलेश बाविस्कर यांच्याकडे तक्रार केली. यानंतर निलेश बाविस्कर यांनी शोध घेतला असता पुजा महामुनी यांचा अर्ज आधीच अप्रूव्हड झाला असल्याचे समोर आले. मात्र, त्यांच्या आधारकार्ड ला सातारा येथील जाधव नामक व्यक्तीचा मोबाईल नंबर ड झाला होता. याबाबत अधिक माहिती मिळवली असता या व्यक्तीने आपल्या पत्नीच्या नावे एक नव्हे तब्बल ३० अर्ज भरल्याचे दिसून आले. यानंतर सदरची तक्रार पनवेल तहसिलदारांकडे करण्यात आली असून तपास सुरू केला आहे.

## देशाचे भविष्य शिक्षकांच्या हाती

### गटशिक्षणाधिकारी जाधव यांचे प्रतिपादन




**लातूर/प्रतिनिधी**

शिक्षकदिन म्हणजे शिक्षकांचा सन्मान होय. देशाचे भविष्य शिक्षकांच्या हाती आहे. ज्ञानदान ही पवित्र प्रक्रिया आहे. भारतीय संस्कृतीमध्ये ज्ञानदानाला महत्त्वाचे स्थान आहे. गुरु-शिष्य हे विश्वासाचे आणि त्यागाचे नाते आहे, असे प्रतिपादन पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी एन. एम. जाधव यांनी केले. येथील पंचायत समितीच्यावतीने आयोजित शिक्षकदिन कार्यक्रमात गटशिक्षणाधिकारी जाधव बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी तुकाराम भालके होते. यानिमित्त राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने गटशिक्षणाधिकारी जाधव व अन्य मान्यवरांचा फेटा बांधून, शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी राजमाता जिजामाता संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर, व्ही. व्ही. हरिदास आदी उपस्थित होते. गटविकास अधिकारी भालके यांनीही अध्यक्षीय समारोपात मार्गदर्शन केले. यावेळी तालुक्यातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष देवीदास काळे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी**

भाजपचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष देवीदास काळे यांचा वाढदिवस आज ५ सप्टेंबर रोजी लातूर शहरातील विविध भागात विविध सामाजिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी देवीदास काळे यांनी अंबाजोगाई रोडलगत असलेल्या मातोश्री आश्रमाला भेट देवून तेथील वृद्धांसोबत अल्पोपहार घेवून त्यांचे आर्शिवाद घेतले. त्यानंतर त्यांनी कॉक्सीट कॉलेजवळील श्री गुरुगणेश जीवनराज जैन गोरक्षण संस्थेत जाऊन गो मातेला चारा दिला. तसेच ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिर येथे जाऊन मनोभावे दर्शन घेतले श्री सिद्धेश्वर महाराजांचा अभिषेक केला. तसेच सुरत शहावली दर्गा येथे जाऊन चादर चढवण्यात आली. गंजगोलाई येथील जगदंबादेवी, बालाजी मंदिर व रामलिंगेश्वर मंदिर येथे जाऊन देवीदास काळे यांच्या हस्ते पूजा व आरती करण्यात आली. शासकीय रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप करून रुग्णांच्या नातेवाईकांना अन्नदान करण्यात आले. प्रभाग १ मध्ये विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला. महात्मा गांधी चौकात वृक्षारोपण, कातपूर रोड येथील मतिमंद विद्यार्थ्यांना फळे व खाऊ वाटप करण्यात आले. दरम्यान लातूर शहरातील



विविध भागात वाढदिवसानिमित्त भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वृक्षारोपण, शालेय साहित्य वाटप, अनाथ मुलांना गणवेश वाटप, गोशाळा येथे गो मातेला चारा वाटप, लाडक्या बहिणींचा सन्मान यांसह अनेक सामाजिक कार्यक्रम घेण्यात आले. रामलिंगेश्वर मंदिरात मुख्य अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या ठिकाणी शहर व जिल्ह्यातील असंख्य मान्यवरांनी देवीदास काळे यांना पुष्पहार, बुके देवून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच विशेष म्हणजे देवीदास काळे यांच्या हस्ते महिलांना इ श्रम कार्ड वाटप करण्यात आले. यावेळी भाजपचे माजी खासदार डॉ. सुनिल गायकवाड, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ॲड.गणेश गोमचळे, आबाजी चौगुले, माजी उपमहापौर दिपक सूळ, माजी नगरसेवक रवी सूडे, सरचिटणीस शिरीष कुलकण, प्रवीण कस्तुरे, मीनाताई भोसले, रागिणीताई यादव, गोपाळ वांगे, अजय भूमकर, चंद्रकांत खटके, संजय गिर, ललित तोष्णीवाल, अभिजीत मुनाळे, राहुल भुतडा, संतोष तिवारी, आबेद सय्यद, व्यंकटेश सरवदे, बालाजी मारकडे, राजकुमार गोजमगुंडे, बाबा कांबळे, भरत लोंढे राजकुमार सोनवणे तसेच भाजपचे पदाधिकाऱ्यांसह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, डॉक्टर्स, वकिल, पत्रकार, व्यापारी, श्री रामलिंगेश्वर समिती, शहरातील विविध संस्था, संघटना यांच्या वतीने देवीदास काळे यांना प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा देण्यात आल्या.

## थोडक्यात वृत्तांत

### कालबाह्य सौंदर्य प्रसाधनांची भिवंडीत विक्री

भिवंडी : कालबाह्य सौंदर्य प्रसाधनांच्या वस्तूंची साठवणूक करून त्यावर नव्याने स्टीकर चिटकवून त्याची विक्री करण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी १ कोटी २५ लाख ८६ हजार २६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. कंपनीचा व्यवस्थापक जतीन शर्मा, सुरेश विश्वकर्मा यांच्याविरोधात गुन्हा दाखल आहे. ओवळी गावाजवळील सागर कॉम्प्लेक्समधील एका गोदामात कालबाह्य सौंदर्य प्रसाधनांच्या वस्तूंची विक्री केली जात असल्याची माहिती नारपोली पोलिसांना मिळाली होती. पोलिसांच्या पथकांनी गोदामाची पाहणी केली असता, या गोदामात कालबाह्य सौंदर्य प्रसाधनांची विक्री होत असल्याची गंभीर बाब उघड झाली आहे. तसेच या कालबाह्य वस्तूंवर नव्याने मुदत असलेले स्टीकर चिटविण्यात आले होते. याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात जतीन शर्मा, सुरेश विश्वकर्मा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### संत सेना महाराज जयंती निमित्त कार्यक्रम



भिवंडी : नाभिक समाज उन्नती मंडळ भिवंडीच्या वतीने संत सेना महाराज जयंती निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन कोंबडपाड्यातील गाजेंगी हॉलसमोरील पार्वती मंगल कार्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये सत्यनारायणाची महापूजा, भक्त गीते, सत्कार समारंभ, विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि वह्या वाटप अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासह भक्तांसाठी रात्री महाप्रसाद (भंडारा) ठेवण्यात आला होता. यावेळी विलास आर पाटील, मयुरेश पाटील, वंश राका, सुभाष माने, प्रशांत लाड यांच्या उपस्थितीत संत सेना महाराज जयंती संपन्न झाली.

### १० सप्टेंबरला कोकण विभागीय पेन्शन अदालत

नवी मुंबई : कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार दि. १० सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे. सदर पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे, असे महेंद्र बेलदार, तहसिलदार, (सामान्य प्रशासन) कोकण विभाग यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

### ९ सप्टेंबर रोजी विभागीय लोकशाही दिन

नवी मुंबई : कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवार ९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, १ ला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील प्रमुख अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे उप आयुक्त संजीव पलांडे यांनी कळविले आहे.

**जाहिरात**

बहुजन हिताय विद्यार्थी वसतिगृह, उल्हासनगर येथे स्वयंपाकीचे पद रिकामे असून, स्वयंपाकी म्हणून काम करू इच्छित असलेल्या महिलांनी वसतिगृहाचे अधिक्षक यांचा संपर्क करावा.


अश्वजीत मैत्रक (अधिक्षक)

संपर्क : ९८९८११९७३७

# व्हि.एस. पँथर्सचे विनोद खटके यांचा वंचित बहुजन आघाडीत जाहीर प्रवेश

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर येथील व्हि .एस. पँथर्सचे संस्थापक विनोद खटके यांच्या वंचित बहुजन आघाडीतील जाहीर प्रवेशाच्या अनुषंगाने शहरातील दयानंद सभागृहात एक महामेळावा आयोजीत करण्यात आला होता. या महामेळाव्यात विनोद खटके यांनी आपल्या असंख्य समर्थकांसह ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वंचितमध्ये प्रवेश केला. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक पाटील, अविनाश भोसीकर, प्रवीण रणबादल, संतोष सूर्यवंशी, सलीमभाई, सावंत, रमेश गायकवाड, सय्यद, मंजुषा निंबाळकर, लामतुरे मॅडम यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, राज्यात वंचित बहुजन आघाडीने संविधान बचाव यात्रा काढली नसती तर अवघा मराठवाडा पेटला असता. राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीत मराठा विरुद्ध ओबीसी अशी लढत होणार आहे. त्यामुळे मतदारांनी जात पाहून निर्णय न घेता सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने वंचितच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे असे अव्हान त्यांनी केले. सध्या राज्यात आजघडीला सगळा अनागोंदी कारभार चालला



आहे. सामाजिक शांतता राहिली नाही, महिला भगिनी सुरक्षित नाहीत. लैंगिक अत्याचार वाढले आहेत. आरक्षणाच्या कारणावरून सरकार दिशाभूल करत असल्याचा घणाघाती आरोप करून ॲड. प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले की, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण एक तत्वनिष्ठ नेते होते. तत्वासाठी त्यांनी कधीही पदाला महत्व दिले नाही. आज त्यांच्यासारख्या तत्वनिष्ठ नेत्याची राज्याला देशाला आवश्यकता आहे. राज्यात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार मनोज जरांगे यांच्या मागणीला पाठिंबाही देत नाहीत, विरोधही करत नाहीत. याचाच अर्थ ते योग्य निर्णय घेऊ शकत नाहीत. त्यामुळे मतदारांनी आगामी निवडणुकीत अशा निर्णय क्षमता नसलेल्या पक्ष आणि नेत्यांना थारा देऊ नये, असे मत व्यक्त करून शरद पवार हे थोर नेते आहेत, ते दाऊदचेही मित्र असल्याचे उपहासाने नमूद केले. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी कोणीही या आणि टिकली मारून जा, अशा वृत्तीच्या लोकांना त्यांची जागा दाखवून द्यावी. पैसे - दारूचे प्रलोभन दाखविणाऱ्यांना त्यांची जागा दाखवून द्यावी. विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर येणारे काही महिने वादळी असणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला यातून राज्य शासनाचा कारभार किती भ्रष्ट आहे ही बाब समोर आली. त्यामुळे सर्वांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. आजच्या राजकारणाचा आधारस्तंभ हा विकास नाहीतर दंगल घडविणे, विभाजन घडविणे हेझल आहे, हे राज्याच्या हिताच्या दृष्टीने योग्य नाही. महिला-मुलींच्यावर लैंगिक अत्याचार होत आहेत. महिलांच्या शरीराची विटंबना होत आहे. बलात्काऱ्यांना फासावर लटकावून हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी कठोर निर्णयक्षमता असणारे सरकार हवे आहे. आजच्या परिस्थितीवर सरकारचे नियंत्रण नसल्याचा आरोपही त्यांनी केला. वंचितमध्ये प्रवेश केलेल्या विनोद खटके यांनी आपल्या मनोगतात व्हि. एस. पँथर्सच्या माध्यमातून आजपर्यंत केलेल्या सामाजिक कार्याची माहिती देऊन यापुढे वंचितच ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशाप्रमाणे काम करण्यास आपण व आपले सहकारी तयार असल्याचे सांगितले. यावेळी सय्यद, मंजुषा निंबाळकर, रमेश गायकवाड, संतोष सूर्यवंशी, अशोक पाटील, अविनाश भोसीकर यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष मांदळे यांनी तर आभार प्रदर्शन प्रतीक कांबळे यांनी केले. यावेळी अमोल सुरवसे, आनंद जाधव, किरण पांचाळ, शरद किणीकर, असदभाई शेख, रवी कांबळे, अतुल होळकर,. नितीन पडसाळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



**सर्वपल्ली डॉक्टर राधाकृष्णन यांचा जन्मदिवस संपूर्ण भारतात शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून लायन्स इंटरनॅशनल मल्टिपल डिस्ट्रिक्ट ३२३१ तर्फे २०२४ चा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा शिवाजी विद्यालय, काळाचौकी येथे संपन्न झाला. सदर समारंभात गीता नितांत राऊत (पूर्वाश्रमीच्या गीता दतात्रय सावे - आगाशी) यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करून गौरवण्यात आले. सौ. गीता राऊत ह्या जोगेश्वरी येथील सन्माननीय श्रीम. स्मिता जी चव्हाण संचलित विद्यार्थी विकास मंडळाच्या श्रमिक विद्यालय या शाळेमध्ये गेली २७ वर्षे कार्यरत असून त्या लोणावळा (बोर्डी) येथील राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त कै. खंडेराव आत्माराम राऊत यांच्या स्नुषा आहेत. या पूर्वी त्यांना २०१८ मध्ये संस्थेतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.**

09 TO 15 SEPTEMBER 2024 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 9/7/2024 11:27 PM Page 1






# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विश्वशांती बुद्ध विहाराचे लोकार्पण



**लातूर/प्रतिनिधी**

उदगीर जि.लातूर येथील तळवेस परिसरातील नवनिर्मित विश्वशांती बुद्ध विहाराचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज लोकार्पण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सर्वश्री आमदार विक्रम काळे, रमेश कराड, अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे उपस्थित होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण, फीत कापून विहाराचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांनी विहारातील गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बुद्ध वंदना झाली. वंदनेनंतर उपस्थित बौद्ध भिक्खूंना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी चिवर दान केले. बौद्ध भिक्खू यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना गौतम बुद्धांची मूर्ती भेट दिली. क्रीडा मंत्री श्री. बनसोडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

विहाराची वैशिष्ट्ये : उदगीर येथील विहार कर्नाटक येथील कलबुर्गीच्या बुद्ध विहाराची प्रतिकृती आहे. एक हेक्टर १५ आर एवढ्या जागेवर या विहाराची उभारणी करण्यात आली आहे. विहारात १२०० अनुयायांची बैठक व्यवस्था असलेले ध्यान केंद्र तयार करण्यात आले आहे. विहार परिसरात प्रवेश करण्यासाठी एक मुख्य प्रवेशद्वार तयार करण्यात आले असून या प्रवेशद्वाराची रचना बिहारमधील सांची स्तूपाप्रमाणे करण्यात आली आहे.

# डॉ. शितल कोरडकर राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित



**विरार/प्रतिनिधी**

विरार पूर्व येथील आगाशी विरार अर्नाळा शिक्षण संस्था संचलित पद्मश्री भाऊसाहेब वर्तक पदवी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शितल कोरडकर यांना पर्यावरण मित्र बहुउद्देशीय सामाजिक संस्था, भारत (शासनमान्य) यांनी राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन सन्मानित केले. डॉ. शितल कोरडकर यांनी गेली २४ वर्ष शिक्षण क्षेत्रात आपले विशेष योगदान दिले आहे. आजवर त्यांचे एकूण ५ संशोधन पेपर नामांकित जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहेत. मुंबई विद्यापीठात त्यांनी चित्रपट रूपांतर आणि प्रमाणीकरण : नटसम्राट, बर्फी, जुनून, फितूर आणि मी शिवाजी राजे भोसले बोलतोय यांचा अभ्यास सखोल अभ्यास करून सदर विषयावरती आपला शोध निबंध सादर केला. मुंबई विद्यापीठाने उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च अशा विद्यावाचस्पती (पी.एच.डी) या पदवीने त्यांना सन्मानित केले. विद्यार्थ्यांसाठी नेहमीच ...पान ६ वर

# गंभीर गुन्ह्याची जलदगतीने उकल केल्याबद्दल वाडा पोलिसांचा सत्कार



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील नेहरोली येथे दिनांक १७ ऑगस्ट रोजी एक भाडेकरू रुपयांच्या हव्यासापोटी घरमालक, त्यांची पत्नी व मुलगी अश्या तिघांची हत्या करून उत्तरप्रदेशत पळून गेला होता. काहीही पुरावा नसताना फक्त संशय आल्याने पळून गेलेल्या आरोपीला पाच दिवसात अटक करून गजा आड केल्या बद्दल वाडा पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय किंद्रे व त्यांच्या सहकाऱ्याचे वाड्यातील पत्रकारांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी पत्रकार सचिन भोईर, मच्छिन्द्र आगिवले, संजय लांडगे, शशिकांत कासार, शेखर पवार उपस्थित होते.

# वसई न्यायालयाची जमीन आठवड्यात नावे करण्याच्या आश्वासनानंतर अखेर वकिलांचे आंदोलन तूर्तास स्थगित






**वसई/प्रतिनिधी**

वसई तालुक्यातील वकील संघटनांनी दि. ०२/०९/२०२४ रोजीपासून न्यायालयाच्या नव्या ईमारतीसाठी जागा कोर्टाच्या नावे व्हावी, यासाठी आंदोलन सुरू केले होते. आज सार्वजनिक बांधकाम मंत्री नामदार रविंद्र चव्हाण ह्यांनी एका आठवडयाच्या आत संबंधित जमीन कोर्टाच्या नावे करण्याचे आश्वासन दिल्यामुळे सर्व बाबींचा साकल्याने विचार करून सर्व वकीलांनी सुरू केलेले हे आंदोलन तात्पुर्ते स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. वसईतील न्यायालयाची इमारत जिर्ण झाली असून वाढते दावे व केसेस ह्यांची संख्या लक्षात घेता चाळीस (४०) अधिक न्यायालय असणे आवश्यक असताना केवळ अकरा (११) न्यायधीशांना काम करावे लागत असल्याने प्रचंड दिरंगाई होत आहे. तर त्याचा परिणाम न्यायदानावर होत असल्याने न्यायालयाची सुसज इमारत असावी यासाठी वसईतील विविध वकील संघटना मागील अनेक वर्ष प्रयत्नात आहेत आणि ह्याचे फलीत म्हणून माननिय उच्च न्यायालयाने गाव मौजे मालोंडे येथील सिटी सर्वे नं. ३७६ या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ५७०० चौ.मि. जागेवर न्यायालयाच्या इमारतीचा प्रस्ताव मंजूर करून शास्नाकडे पाठविलेला आहे. मात्र शासकीय स्थरावर सदरची जागा कोर्टाच्या नावे होण्यास विलंब होत असल्यामुळे वसईतील चारही वकील संघटनांसह सर्वच वकिलांनी सहभागी होत शांततापूर्ण मोर्चा काढून आंदोलनाला सुरवात केली. सदरची जागा न्यायालयाच्या नावे होईपर्यंत दररोज धरणे आंदोलन सुरू ठेवण्याचा निश्चय वकीलांनी केला होता. या आंदोलनात मोठ्या प्रमाणात वकीलवर्ग, पक्षकार व राजकीय कार्यकर्ते असे शेकडो लोक सहभागी झाले असून सर्व वकीलांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शविलेला आहे. आज आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी मा. तहसीलदार व मा. उपविभागिय अधिकारी यांनी आंदोलनाच्या ठिकाणी भेट देऊन वकीलांची विचारपूस करून मागण्या समजून घेतल्या व त्याचा ...पान ६ वर

# सोमेश्वर हायस्कूल येथे शिक्षकदिन उत्साहात साजरा



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सध्या शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल होत आहेत हे बदल स्वीकारून विद्यार्थी व पालकांनी दर्जेदार विद्यार्थी घडवावेत असे आवाहन श्री सोमेश्वर हायस्कूल शाळेचे मुख्याध्यापक निंगप्पा शिवयोगी यांनी केले. श्री सोमेश्वर हायस्कूल येथे शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात शिवयोगी बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे सा. क्राईम संध्या सोलापूर जिल्हा प्रतिनिधी इरप्पा बोरीकरजगी यांच्या हस्ते डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या फोटो प्रतिमेस हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक गुरु अचलेरे यांनी केले. उच्च शिक्षणामुळेच यशाचे शिखर गाठणे शक्य होणार आहे. ही बाब लक्षात ठेवून परिश्रमाची तयारी ठेवावी असेही शिवयोगी यांनी सांगितले. विकास खुने यांनी अभ्यासपूर्ण विवेचन व मार्गदर्शन केले. माणूस शिक्षकाने सर्वज्ञ होतो हे त्यांनी त्या काळात सांगितले होते. सर्वानी त्यांच्या विचाराची कास धरावी असेही आवाहन शिवयोगी यांनी केले. यावेळी विद्यार्थी ही मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास मुख्याध्यापक निंगप्पा शिवयोगी, सहशिक्षक शरणप्पा वागदारी, गुरुबसप्पा अचलेरे, भिमाशंकर खुने, सुरज शेजाळे, जयराज भरले, सहशिक्षिका शुभांगी पाटील, परिचर बाबुराव अवताडे, लिपिक संध्याराणी बिराजदार, वाहन चालक राजकुमार कुंभारीकर, विठ्ठल कोगे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेडचे खासदार कै.वसंतराव चव्हाण कुटुंबियांचे राहुल गांधी यांनी केले सांत्वन



**लातूर/प्रतिनिधी**

नांदेडचे खासदार वसंतराव बळवंतराव चव्हाण यांचे नुकतेच निधन झाले आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, प्रदेश काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले व माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी नांदेड जिल्ह्यातील नायगाव येथे जाऊन नांदेडचे खासदार कै.वसंतराव बळवंतराव चव्हाण कुटुंबियांचे सांत्वन करून त्यांना धीर दिला. यावेळी रविंद्र वसंतराव चव्हाण, रणजीत वसंतराव चव्हाण, लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार मोहन हंबर्डे, माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, लोहा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शरद पवार आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, चव्हाण कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते.

# नैसर्गिकरित्या वाढलेल्या रानभाज्यांना महत्त्व वाढतेय -आ.राजेश पाटील






**वसई/प्रतिनिधी**

रासायनिक खतांमुळे भाज्या वरही परिणाम झाल्याचे दिसून येत असताना नैसर्गिक रित्या वाढलेल्या रानभाज्याना महत्त्व वाढले असताना जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार अन्नातील भेसळीच प्रमाण वाढले असताना आरोग्य वर्धक रानभाज्यांना महत्त्व आले आहे. या रानभाज्यांच्या माध्यमातून आदिवासी महिलांना ही रोजगार उपलब्ध होत आहे असे प्रतिपादन बोईसरचे आमदार राजेश पाटील यांनी नालासोपारा येथे केले. वसई विरार महापालिका, वसई तालुका पत्रकार संघ व यंग स्टार ट्रस्ट विरार यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार ३ सप्टेंबर रोजी नालासोपारा येथील कृष्णा मोरू पाटील देशमुख हायस्कुलमध्ये रानभाज्यांचे प्रदर्शन व विक्री कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार राजेश पाटील यांनी दीप प्रज्वलित करून केले. याप्रसंगी पालिकेच्या उपायुक्त विशाखा मोटघरे, तुर्किंज एज्युकेशन ट्रस्टचे दामोदर देशमुख, माजी नगसेवक निलेश देशमुख, माजी सभापती किशोर पाटील, अतुल साळुंखे, पंकज पाटील, वसई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप पंडित, केडीएमपी हायस्कूलचे अधीक्षक माणिकराव दुतोंडे सर, सहायक आयुक्त विश्वनाथ तळेकर, मोहन संखे तसेच उमेद अभिमान व बचत गटाच्या प्रमुख प्रिया आंबेकर आदी मान्यवर उपस्थित होते. या रानभाज्या प्रदर्शन व विक्री कार्यक्रमात उमेद अभियानातर्फे ३५ आदिवासी महिला भगिनी यांनी १५ प्रकारच्या विविध रानभाज्याचे २० स्टॉल लावले होते. त्यास नालासोपारा शहरवासीयांनी उत्तम प्रतिसाद दिला. या कार्यक्रमात बोलताना राजेश पाटील यांनी सांगितले की, महानगरपालिका व पत्रकार संघातर्फे आदिवासी महिलांना एक रोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्यात आले आहे. महापालिकेने यापुढे ही असे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून महिला बचत गटांना प्रोत्साहन द्यावे. तसेच पत्रकारांनी या चांगल्या उपक्रमाची प्रसिद्धी देऊन त्यांना बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी, तर या माहिलांच्या भाज्यांना पैकींग स्वरूपात विक्रीसाठी काही करता आले, तर त्यावरही पालिकेने विचार करावा अर्थात राजेश पाटील यांच्या सुचनेवर सहाय्यक आयुक्त विश्वनाथ तळेकर यांनी तात्काळ सदरच्या सुचनेवर महापालिका नक्कीच विचार करेल असे आश्वासन दिले. ...पान ६ वर